
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५ वर्ष - तिसरे अंक २०४ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## देशभरात १ नोव्हेंबरपासून आधार, बँकिंग व एलपीजीवर नवे नियम होतील लागू

मुंबई : देशभरात १ नोव्हेंबरपासून अनेक महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत, ज्यांचा थेट परिणाम सामान्यांच्या दैनंदिन जीवनावर आणि खिशावर होणार आहे. या बदलांमध्ये आधार कार्ड अपडेट, बँकिंग नियम, एलपीजी-सीएनजी दर, क्रेडिट कार्ड शुल्क आणि म्युच्युअल फंड गुंतवणुकीचे नवे नियम यांचा समावेश आहे. यूआयडीएआयने आधार अपडेट प्रक्रिया अधिक सुलभ केली असून, आता नागरिकांना नाव, पत्ता, जन्मतारीख किंवा मोबाईल क्रमांक यांसारखी माहिती अपडेट करण्यासाठी आधार केंद्रात जाण्याची गरज नाही. ही प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन करता येणार आहे. मात्र, बायोमेट्रिक माहिती अपडेट करण्यासाठी केंद्राला भेट देणं आवश्यक असेल. विशेष म्हणजे यूआयडीएआय आता रेशन कार्ड, मनरेगा, पॅन, पासपोर्ट आणि शाळेच्या नोंदीसारख्या सरकारी डेटाबेसमधून माहिती पडताळणार आहे. त्यामुळे दस्तऐवज अपलोड करण्याची गरजही उरणार नाही. बँकिंग क्षेत्रातही मोठा बदल होत आहे. आता ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यांसाठी, लॉकर्ससाठी आणि सुरक्षित कस्टडीसाठी एकाऐवजी चार नॉमिनी ठेवण्याची मुभा असेल. प्रत्येक नॉमिनीला किती हिस्सा मिळेल हे ग्राहक स्वतः ठरवू शकतील. यामुळे मालमत्ता आणि ठेवींच्या वारसाहक्क प्रक्रियेत अधिक स्पष्टता येईल. दरम्यान, एलपीजी, सीएनजी आणि पीएनजीच्या किमती १ नोव्हेंबरपासून पुन्हा निश्चित केल्या जातील. तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातील स्थितीनुसार दर ठरवतात, त्यामुळे गॅसच्या किमती वाढण्याची किंवा घटण्याची शक्यता कायम राहील. एसबीआयने आपल्या क्रेडिट कार्डसंदर्भातही नवे शुल्क लागू केले आहेत. १ नोव्हेंबरपासून असुरक्षित कार्डवर ३.७५ टक्के शुल्क आकारले जाईल. तसेच, जर तुम्ही थर्ड-पार्टी ॲप्सद्वारे शाळा किंवा कॉलेजची फी भरली, तर अतिरिक्त १ टक्का शुल्क द्यावे लागेल. परंतु शाळेच्या अधिकृत वेबसाइट किंवा त्यांच्या पीओएस मशीनद्वारे पैसे भरल्यास कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. त्याशिवाय, १००० रुपयांपेक्षा जास्त वॉलेट लोड करण्यासाठी १ टक्का शुल्क आणि कार्ड-टू-चेक पेमेंटसाठी २०० रुपये शुल्क लागू राहील. म्युच्युअल फंड गुंतवणुकीसंबंधी सेबीनेही पारदर्शकता वाढवण्यासाठी नवे नियम लागू केले आहेत.

## ...पण त्या दोन्ही जागा रिक्त नाहीत, अमित शहांचा विरोधकांना टोला!

बिहार: बिहारमध्ये सध्या विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. ज्यात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैऱ्या झाडण्यात येत आहेत. दरम्यान आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दरभंगा येथे एका सभेत बोलताना विरोधकांना खोचक टोला मारला आहे. यावेळी ते म्हणाले, बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू यादव हे त्यांचा मुलगा तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री बनवू इच्छित आहेत, तर दुसरीकडे काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी ह्या त्यांच्या मुलाला देशाचा पंतप्रधान बनवू इच्छित आहेत. पण ही दोन्हीही पदे रिक्त नाहीत. त्यामुळे विरोधकांना सरळ शब्दात उत्तर मिळाले आहे.



बिहारमध्ये ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होऊन निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे सध्या बिहारमध्ये निवडणूकीसाठी जोरदार प्रचार सुरू आहे. याकरता अनेक दिग्गज नेते मंडळी बिहारच्या विविध शहरात जाऊन सभा, रॅली आणि बैठका घेत आहेत. दरम्यान आज दरबंगा येथे प्रचारार्थ गेलेल्या अमित शाहांनी सभेत बोलताना लालू प्रसाद यादव, तेजस्वी यादव, सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका करत एका दगडात चार पक्षी मारले आहेत. तसेच लालू प्रसाद यादव हे चारा घोटाळा आणि नोकरीच्या बदल्यात जमीन घोटाळा या प्रकरणात सहभागी आहेत. तर दुसरीकडे काँग्रेसवर १२ लाख कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप होत आहेत, असे म्हणत अमित शाह यांनी लालू प्रसाद यादव आणि सोनिया गांधी यांच्यावर घणाघात केला आहे.

## वन डे रँकिंगमध्ये स्मृती मानधनाचे वर्चस्व कायम



मुंबई : आयसीसी महिला एकदिवसीय वर्ल्डकप स्पर्धेत भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधना हिने चमकदार कामगिरी केली आहे. तिने न्यूझीलंडविरुद्धच्या शतकी खेळीच्या बळावर महिलांच्या एकदिवसीय क्रिकेटमधील नंबर १ फलंदाज म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. विश्वचषकातील शानदार प्रदर्शनामुळे मानधनाचे रेटिंग तिच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम स्तरावर पोहोचले आहे. तिची सहकारी, प्रतिका रावलने १२ स्थानांची मोठी झेप घेतली आहे.

स्मृती मानधनाने न्यूझीलंडविरुद्ध १०९ धावांची खेळी केली. तर बांगलादेशविरुद्ध नाबाद ३४ धावा केल्या. ती ८२८ रेटिंगसह अव्वल स्थानावर कायम असून, दुसऱ्या स्थानावर असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या श्ले गार्डनर (७३१) पेक्षा ती तब्बल ९७ गुणांनी पुढे आहे. १२ स्थानांची झेप घेऊन प्रतिका रावल ५६४ रेटिंगसह २७व्या स्थानावर पोहोचली आहे, परंतु दुर्दैवाने, दुखापतीमुळे ती आता या स्पर्धेतील उर्वरित सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. स्मृतीने विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतही उत्कृष्ट कामगिरी केली होती.

## दानिश चिकनाला गोव्यातून अटक

मुंबई : अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या ड्रग्स सिंडिकेटला मोठा झटका बसला आहे. दाऊदचा जवळचा हस्तक आणि मुंबईतील डोंगरी भागात त्याची ड्रग्सची फॅक्टरी सांभाळणारा कुख्यात ड्रग तस्कर दानिश चिकना याला गोव्यातून अटक करण्यात आली आहे. दानिश चिकना हा दाऊद इब्राहिमचा अतिशय जवळचा मानला जातो आणि तो भारतातील दाऊदच्या ड्रग्स सिंडिकेटचा महत्त्वाचा भाग आहे. त्याचे खरे नाव दानिश मर्चंट आहे. दानिश चिकनाला गोव्यातून अटक करण्याची ही कारवाई नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो मुंबईने केली आहे. याआधीही त्याला एकदा एनसीबीने अटक केली होती. त्यावेळी त्याच्यावर डोंगरी परिसरातून संपूर्ण ड्रग्स सिंडिकेट चालवण्याचा आरोप होता.




नांदेड- भटके विमुक्त, बलुतेदार, ओबीसी एल्गार महामोर्चाचे काढण्यात आला. याप्रसंगी उपस्थित भटके विमुक्त, बलुतेदार, ओबीसी बांधवांना वंचित बहुजन आघाडीचे ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यासह इतर ओबीसी नेते उपस्थित होते.

## मतदार यादीतील संभाव्य दुबार नावांबाबत उपाययोजना करण्याचे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी मतदार याद्यांमधील संभाव्य दुबार नावांची तपासणी करून योग्य ती दक्षता घ्यावी व दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश सर्व संबंधितांना राज्य निवडणूक आयोगाने आज दिले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लागू असलेल्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांसाठी जशीच्या तशी वापरली जाते. तिचे केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व ग्रामपंचायतींच्या निवडणुकासाठी प्रभागनिहाय; तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग आणि पंचायत समिती




निर्वाचक गणनिहाय विभाजीत केली जाते. या मतदार याद्यांचे विभाजन करताना विधानसभा मतदारसंघाच्या मूळ यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रारुप अथवा अंतिम मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (**) असे चिन्ह नमूद करण्यात येते. ही संभाव्य दुबार मतदारांबाबत स्थानिकरित्या तपासणी करून ती खरोखरच एकाच व्यक्तीची आहे किंवा वेगळ्या व्यक्तींची आहे, याबाबत तपासणी/ खात्री केली जाईल. मतदाराचे नाव, लिंग, पत्ता व छायाचित्र याची प्राथमिक तपासणीनंतर त्यांत साम्य आढळून त्या मतदाराकडून तो नेमका कोणत्या प्रभागातील, जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/पंचायत समितीच्या गणातील मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज घेतला जाईल. अशा मतदारास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही.

संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास असा मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी आल्यास त्या मतदाराकडून त्याचे नाव असलेल्या इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत आणि करणार नसल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. अशा मतदाराची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला मतदान करण्याची मुभा देण्यात येईल. याबाबत मतदार यादीतील संभाव्य दुबार नावांबाबत करावयाच्या उपाययोजनेसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने आज सविस्तर आदेश निर्गमीत केला आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 'राफेल'मध्ये स्वार

### लढाऊ विमानातून उड्डाण करणाऱ्या पहिल्या राष्ट्रपती!

हरियाणा : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी हरियाणातील अंबाला हवाई दल स्थानकावर राफेल लढाऊ विमानात यशस्वी उड्डाण करून एक नवा इतिहास रचला आहे. राफेलमधून उड्डाण करणाऱ्या त्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. भारतीय सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राफेलमधून केलेल्या या उड्डाणाकडे अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. राफेल लढाऊ विमानांचा वापर 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये करण्यात आला होता. २२ एप्रिल रोजी झालेल्या भ्याड पहलगाम दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने हे लक्ष्यित ऑपरेशन केले होते, ज्यात राफेल विमानांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

राफेलमधून उड्डाण करण्याची ही राष्ट्रपती मुर्मू यांची लढाऊ विमानातली दुसरी वेळ आहे. यापूर्वी, ८ एप्रिल २०२३ रोजी त्यांनी आसाममधील तेजपूर हवाई दल स्थानकावर सुखोई-३० चघख लढाऊ विमानात उड्डाण केले होते. सुखोई-३० MKI मध्ये उड्डाण करणाऱ्या त्या तिसऱ्या राष्ट्रपती आणि लढाऊ विमानात प्रवास करणाऱ्या दुसऱ्या महिला राष्ट्रप्रमुख होत्या. माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी ८ जून २००६ रोजी, तर प्रतिभा पाटील यांनी २५ नोव्हेंबर २००९ रोजी लोहगाव येथील हवाई दल स्थानकावर सुखोई-३० MKI विमानातून यशस्वी उड्डाण केले होते.

## रस्त्यावर ठिय्या आंदोलन करणाऱ्या बच्चू कडूंना कोर्टाचा दणका!

### मुंबई उच्च न्यायालयाची सुमोटो दाखल, बच्चू कडूंना आंदोलन स्थळ रिकामे करण्याचे आदेश!

नागपूर : नागपूर येथील परसोडी गावाजवळ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या ठिय्या आंदोलनावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सुमोटो दखल घेतली आहे.

आंदोलनाची परवानगी २८ ऑक्टोबरसाठी होती मात्र, २९ तारखेला देखील आंदोलन सुरू असल्यामुळे परिसरातील वाहनांना व प्रवाशांना मोठा त्रास होत आहे. या भागात अनेक रुग्णालये असून, रुग्णांना देखील हालचाल करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे खंडपीठाने निदर्शनास आणले.

नागपूर खंडपीठाने बच्चू कडू यांच्यासह आंदोलनात सहभागी असलेल्या व्यक्तींना आज संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आंदोलन



स्थळ रिकामे करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, पोलीस अधिकाऱ्यांनी हा आदेश अंमलात आणण्याची प्रक्रिया सुरू ठेवावी आणि उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत याचा अहवाल सादर करावा, असे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

कोर्टाच्या आदेशानुसार नागपूर पोलीस आयुक्त, परिसराचे पोलीस अधिकारी आणि महामार्ग पोलिस यांनी आदेशाची पूर्तता करण्यास सांगितले आहे. पोलीसांच्या स्पेशल ब्रँचचे डीसीपी सातव यांनीही बच्चू कडू यांना भेटून आदेशाबाबत माहिती दिली.

खरा आहे,
आरोग्यासाठी चांगला आहे
बैद्यनाथ च्यवनप्राश स्पेशल




पॉवर ऑफ 3
चांगली इम्यूनिटी | जास्त ऊर्जा | शक्ति आणि स्फूर्ती
च्यवन-फीट शुगरफ्री पण उपलब्ध
बैद्यनाथ च्यवनप्राश
शुद्ध तुपात तयार केले जाते
सर्व मेडिकल स्टोर्स व आयुर्वेदिक औषधालयात मध्ये उपलब्ध. 844 844 4935

## गरज पडल्यास बळाचा वापर करण्यासही मागेपुढे पाहणार नाही, चीनची अमेरिकेला स्पष्ट धमकी

### ट्रम्प यांच्यासोबतच्या भेटीपूर्वी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग झाले आक्रमक

बीजिंग: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत होणाऱ्या महत्त्वपूर्ण भेटीपूर्वी चीनने तैवानसंदर्भात अत्यंत कठोर भाषेत आपला संदेश दिला आहे. तैवान हा चीनचा अविभाज्य भाग आहे, या आपल्या जुन्या भूमिकेवर बीजिंगने अधिक आक्रमक पवित्रा घेतलेला स्पष्ट झाला आहे. चीनने स्पष्ट केले आहे की ते शांततेचे समर्थन करतात, परंतु गरज पडल्यास बळाचा वापर करण्यासही मागेपुढे पाहणार नाहीत.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांसोबत भेट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग गुरुवारी भेटणार आहेत. या भेटीपूर्वी चीनने तैवानबाबतचे



आपले धोरण अधिक कठोर केल्यामुळे अमेरिका आणि तैवानमधील वाढत्या तणावात आणखी भर पडली आहे. बीजिंगमध्ये आयोजित केलेल्या एका पत्रकार परिषदेत, चीनच्या तैवान व्यवहार कार्यालयाच्या प्रवक्ते पेंग किंगेन यांनी तैवान संदर्भातील आपली मूलभूत भूमिका स्पष्ट केली.

'एक देश, दोन प्रणाली' धोरण काय सांगते?

प्रवक्ते पेंग किंगेन यांनी सांगितले की, एक देश, दोन प्रणाली या तत्त्वानुसार शांततापूर्ण पुनरेकीकरण करणे, हे चीनचे मूलभूत धोरण आहे. म्हणजेच, तैवानने चीनच्या प्रशासनाखाली यावे, पण त्यांना स्वायत्तता मिळेल. मात्र, अलीकडच्या या कठोर वक्तव्यामुळे 'एक चीन' या आपल्या सिद्धांतावर बीजिंग पूर्वीपेक्षा जास्त आक्रमक झाल्याचे संकेत मिळत आहेत. बीजिंग सध्या तरी तैवानवरील आपल्या भूमिकेबाबत जराही माघार घेण्याच्या मूडमध्ये दिसत नाही. एकीकडे चीन आपला पवित्रा कठोर करत असताना, दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले होते की, त्यांना खात्री नाही की या बैठकीत तैवानचा मुद्दा चर्चेसाठी उपस्थित केला जाईल की नाही. मात्र, चीनच्या या ताज्या आणि आक्रमक वक्तव्यामुळे आता बैठकीत तैवानचा मुद्दा चर्चेत येण्याची शक्यता वाढली आहे.

### तैवानचे चीनला कडक प्रत्युत्तर

चीनच्या या आक्रमक भूमिकेला तैवाननेही सडेतोड उत्तर दिले आहे. तैवानच्या राष्ट्रीय सुरक्षा ब्युरोचे संचालक त्साई मिंग-येन यांनी स्पष्ट केले आहे की, चीनचे जे देशभक्त मॉडेल हाँगकाँग आणि मकाऊमध्ये लागू करण्यात आले आहे, ते तैवानवर लागू करणे शक्य नाही. ते म्हणाले की, बीजिंग तैवानची आंतरराष्ट्रीय प्रतिमा कमकुवत करून त्याला हाँगकाँग आणि मकाऊसारखे बनवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, तैवान एक सार्वभौम लोकशाही देश आहे आणि चीनचे हे मॉडेल येथे चालणार नाही. दरम्यान, या वादग्रस्त वक्तव्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव अधिक वाढण्याची चिन्हे आहेत.

दीपावलीनिमित्त फुलंब्री तालुक्यातील हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
मा. श्री. साहेबराव जाधव
सार्वजनिक बांधकाम व अभियंता फुलंब्री

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपती संभाजीनगर विभागीय पर्यटन कार्यालयाला सदिच्छा भेट

## कृषी पर्यटन विकासासाठी सकारात्मक चर्चा

छत्रपती संभाजीनगर : येथील महाराष्ट्र शासन पर्यटन विभागाच्या विभागीय कार्यालयाला महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग मान्यता प्राप्त कृषी पर्यटन केंद्र संचालक समितीच्या वतीने सदिच्छा भेट देण्यात आली.



वजय जाधव साहेबांनी दिलेला वेळ, मार्गदर्शन आणि सकारात्मक प्रतिसाद याबद्दल समितीच्या वतीने मनःपूर्वक आभार. आपल्या मार्गदर्शनाखाली कृषी पर्यटन केंद्रांची वाटचाल अधिक मजबूत आणि दिशादर्शक होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

लहू अवताडे, अध्यक्ष – महाराष्ट्र

या भेटीमध्ये विभागीय उपसंचालक विजय जाधव साहेब यांच्याशी विशेष चर्चा करण्यात आली. चर्चेचा केंद्रबिंदू होता – पर्यटन धोरण २०२४ आणि विभागातील कृषी पर्यटन केंद्रांच्या सर्वांगीण विकासाची दिशा.

छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्हे –

१. छत्रपती संभाजीनगर २. नांदेड ३. लातूर ४. बीड ५. धाराशिव ६. जालना ७. परभणी ८. हिंगोली

या सर्व जिल्ह्यांमधील शासनमान्य कृषी पर्यटन केंद्रांच्या प्रगतीसाठी, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि शाश्वत ग्रामीण रोजगार निर्मिती या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

बैठकीदरम्यान लवकरच एक विभागीय पातळीवरील विशेष मीटिंग आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या मीटिंगमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी साहेब, विभागीय उपसंचालक विजय जाधव साहेब, तसेच सर्व जिल्ह्यांचे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) आणि जिल्हा पर्यटन अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या मीटिंगमध्ये कृषी पर्यटन केंद्रांना शासन पातळीवर अधिक बळकटी देण्यासाठी, १ ग्रामीण भागात शाश्वत पर्यटन कसे उभे राहील, १ कृषी पर्यटनाद्वारे स्थानिकांना रोजगार कसा निर्माण होईल, १ आणि पर्यटन संस्थांमार्फत कृषी पर्यटन केंद्रांना भेटी वाढविण्यासाठी नियोजन – या सर्व बाबींवर सकारात्मक चर्चा होणार आहे.

## युवाच्या नव्या स्टेलर स्पायरल पीपी कव्हर नोटबुक्स

छत्रपती संभाजी नगर : नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या युवातर्फे स्टेलर स्पायरल पीपी कव्हर नोटबुक्स ही आपली नवी नोटबुक सीरिज सादर करण्यात आली आहे. ज्यांना मुक्तपणे लिहायला, नियोजन करायला आणि सर्जनशीलतेने व्यक्त व्हायला आवडते, त्यांच्यासाठी या नोटबुक्स तयार करण्यात आल्या आहेत. आजच्या गतिमान जीवनशैलीशी सुसंगत असे या नोटबुक्सचे डिझाइन आहे.न फाटणारे, मजबूत आणि पाणी न शोषणारे पॉली कव्हर असलेल्या या नोटबुक्समध्ये तुमचे लिखाण रोजच्या वापरामुळे किंवा अनवधानाने सांडलेल्या द्रवांपासून सुरक्षित राहते. जाड ६४ जीएसएम कागदामुळे लेखनाचा अनुभव अधिक स्मूद आणि आनंददायी होतो. तसेच या कागदामुळे शाई पसरत नाही आणि मागच्या पानावर उमटतही नाही. त्यामुळे प्रत्येक पान स्वच्छ आणि प्रोफेशनल दिसते. ट्रेंडी मेटॅलिक फिनिश कव्हर डिझाइन्समुळे युवाची स्टेलर नोटबुक्स तुमच्या स्टेशनरी कलेक्शनला प्रीमियम आणि आधुनिक लुक देतात. टिकाऊ आणि विश्वासार्ह अशा या नोटबुक्स प्रत्येक वर्गासाठी, प्रोजेक्टसाठी आणि कल्पनेमध्ये साथ देण्यासाठी बनवलेल्या आहेत.

## शेतकऱ्यांनी देहातवर विश्वास दाखवला

जळगाव : देशातील सर्वात मोठी कृषी तंत्रज्ञान कंपनी देहातने ग्रेट गहू महोत्सवाचा दुसरा हंगाम सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत, देहातच्या संशोधन गव्हाच्या बियाण्या खरेदी केल्यावर एकूण २००१ विजेत्या शेतकऱ्यांना बोलेरो, ट्रॅक्टर आणि बुलेटसह आकर्षक भेटवस्तू मिळतील. गेल्या रब्बी हंगामात देशभरातील १.५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेतला होता. त्यापैकी २,००१ विजेत्या शेतकऱ्यांना विशेष बक्षिसे देण्यात आली. योजनेचा सर्वोच्च पुरस्कार भोपाळच्या जितेंद्र मीना (गब्बर) यांना मिळाला, ज्यांनी महिंद्रा भूमीपुत्र ट्रॅक्टर जिंकला. दुसरा सर्वोच्च पुरस्कार, मारुती अल्टो, पटनाचे गोलू कुमार यांनी जिंकला.

## 'डिव्हाइन सरेंडर' - शांतता, जागृती आणि करुणेचा संदेश देणारे बौद्ध गीत मुंबईत सादर

मुंबई : संगीत, जागरुकता आणि आध्यात्मिकतेची सांगड घालणारे 'डिव्हाइन सरेंडर – द बुद्धिस्ट अँथम ऑफ पीस, अवेकनिंग अँड कंपॅशन' हे गीत चर्चगेटमधील डाऊनटाऊन २० हॉल येथे आयोजित कार्यक्रमात अधिकृतपणे प्रकाशित करण्यात आले. माजी मंत्री आणि विद्यमान आमदार श्री. राजकुमार बडोले यांनी लिहिलेल्या या गीतामध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी असलेल्या शांतता, आत्मबोध आणि करुणा या मूल्यांचा संदेश अंतर्भूत आहे. या गीतामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवलेले अभिनेते गगन मलिक यांनी प्रतीकात्मक भूमिका साकारली आहे, तर सुप्रसिद्ध बौद्ध संगीतकार पावा यांनी संगीतबद्ध आणि स्वरबद्ध केले असून ध्यान, संगीत आणि जागरूकतेचा अद्वितीय संगम साधत त्यांनी हे गीत अधिक प्रभावी केले आहे. या आध्यात्मिक निर्मितीमध्ये दिग्दर्शक निराज प्रभाकर यांनी कलात्मकतेची भर घातली आहे आणि युगंधर क्रिएशन्सच्या अनिकेत बडोले यांनी या गीताची निर्मिती केली आहे. हे गीत थाई, व्हिएतनामी, श्रीलंकन, कंबोडियन, बांगलादेशी अशा अनेक भाषांमध्येही प्रदर्शित करण्यात येणार आहे.

## सचिदानंद उपाध्याय यां ना टाइम मॅगझिनमध्ये दुसऱ्यांदा स्थान

मुंबई: लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेड (एलएमआयएल) चे मॅनेजिंग डायरेक्टर सचिदानंद उपाध्याय यांनी एक उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे – टाइम मॅगझिनमध्ये सलग दुसऱ्यांदा स्थान मिळवून. हा दुर्मीळ सन्मान त्यांना त्या निवडक जागतिक व्यावसायिक नेत्यांच्या गटात स्थान देतो, ज्यात भारतातील काही प्रतिष्ठित उद्योग नेतेही सामील आहेत, ज्यांना उद्योग आणि समाजातील योगदानासाठी दोनदा फीचर केले गेले आहे.

## ऊसाच्या किमतीत प्रति क्विंटल ३० रुपयांनी वाढ

मुंबई – योगी सरकारने पुन्हा एकदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी ऊसाच्या किमतीत प्रति क्विंटल ३० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशचे ऊस विकास आणि साखर उद्योग मंत्री लक्ष्मी नारायण चौधरी यांच्या मते, सुरुवातीच्या ऊसाच्या वाणांची किंमत आता प्रति क्विंटल ४०० रुपये आणि सामान्य वाणांची किंमत ३९० रुपये निश्चित करण्यात आली आहे. या वाढीमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अंदाजे ३,००० कोटी रुपयांची अतिरिक्त देयके मिळतील. योगी सरकारच्या कार्यकाळात ऊसाच्या किमतीत वाढ होण्याची ही चौथी वेळ आहे. या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेलच, शिवाय राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतही नवीन ऊर्जा निर्माण होईल.

## स्तनाच्या आरोग्याबाबत जागरूकता

मुंबई: भारतातील सर्वात विश्वासार्ह विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एसबीआय लाईफ इन्शुरन्सने एक महत्त्वाचा उपक्रम राबवत स्तनाच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. ज्या विषयावर खासगीतही चर्चा होत नाही, अशा विषयावर मोकळेपणाने चर्चा होईल यासाठी प्रयत्न तर केलेच पण या उपक्रमाद्वारे 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स' स्थापित करून हा संदेश जागतिक स्तरावर नेऊन ठेवला आहे. 'हग ऑफ लाईफ' हा संदेश देणाऱ्या गरम पाण्याच्या १,१९१ पिशव्या वापरून थँक्स-ए-डॉटच्या साहाय्याने स्तनांची स्वतःची तपासणी करा हा संदेश देणारा सर्वात मोठा मोझेक तयार केला आहे.

# अतिवृष्टीची मदत व कर्जमाफी साठी सोयगावचे शेतकऱ्यांचा संताप उफाळला

## सोयगाव तहसीलला ठोकले कुलूप;-सोयगाव शहरातील घटना

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९

सोयगाव सह तालुक्यात झालेल्या सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीच्या नुकसानीची मदत व कर्जमाफी ची घोषणा होत नसल्याने बुधवारी( दि.२९) संतप्त शेतकऱ्यांनी सकाळी साडे दहा वाजता सोयगाव तहसील कार्यालयाला थेट कुलूप ठोकून तालुका प्रशासनाचा व शासनाबद्दल संताप व्यक्त केला दरम्यान सकाळी साडे दाह वाजता लावलेले कुलूप दुपारी दोन वाजेपर्यंत होते त्यामुळे तब्बल चार तास सोयगाव तहसील कुलूपबंद होते.



तालुक्यात ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यात अतिवृष्टी मुळे नुकसान झाले आहे.दरम्यान दोन महिन्यांपासून नुकसानीची भरपाई मिळत नसून जळगाव जिल्ह्यातील शेजारच्या तालुक्याना मात्र ही मदत मिळाली मात्र सोयगावला का नाही असा संतप्त सवाल या शेतकऱ्यांनी केला आहे.दरम्यान तहसीलदार हजर नसल्याने तहसीलदार कार्यालयात येईपर्यंत कुलूप न उघडण्याचा निर्णय संतप्त शेतकऱ्यांनी घेतला होता.त्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांना बाहेर बसून तहसीलदार यांची प्रतीक्षा करावी लागली होती शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून संतप्त शेतकऱ्यांनी सरकार विरोधी घोषणा बाजी करत थेट तहसील कार्यालय गाठून तहसील कार्यालयाच्या दरवाजाला कुलूप ठोकले.यावेळी शेतकरी रविंद्र काळे,विजय काळे,ड योगेश पाटील,राजेंद्र काळे,राजू दुतोंडे,पूनम परदेशी यांच्या नेतृत्वाखाली पाचशे ते सहाशे शेतकऱ्यांनी थेट सोयगाव तहसीलला कुलूप ठोकले होते दरम्यान यावेळी तहसील कार्यालयाच्या आवारात शेतकऱ्यांनी घोषणा बाजी केली होती.दरम्यान दुपारी दोन वाजता तहसीलदार मनीषा मेने या घटनास्थळी आल्यावर त्यांनी रवींद्र काळे,विजय काळे,ड.योगेश पाटील,राजेंद्र काळे यांचेशी चर्चा करून बाधित शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम बाबत अद्याप अध्यादेश आलेला नाही याद्या अपलोड झालेल्या आहेत फार्मर आय डी काढलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात अध्यादेश येताच अनुदान जमा होण्याची प्रक्रिया सुरू होईल असे आश्वासन दिले व कुलूप उघडण्यात आले.

अखेरीस दुपारी दोन वाजता तहसीलदार मेने या पोलीस बंदोबस्तात तहसील कार्यालयात दाखल झाल्या त्यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी त्यांना अतिवृष्टी च्या नुकसानीची मदत दोन दिवसात खात्यात वर्ग करा,कर्जमाफीचा शासनाने लवकर निर्णय घ्यावा,पीकविमा मंजूर करावा यासह विविध पाच मागण्यांचे निवेदन यावेळी दिले.यावेळी रवींद्र काळे,विजय काळे,राजेंद्र काळे,ड योगेश पाटील,हर्षल काळे,राजू दुतोंडे,कृष्णा पाटील,अरुण सोहनी,पूनम परदेशीं, पुंडलिक मानकर,अनिल चौधरी,अमोल मापारी,अनिल पाटील,राजू बडक,नितीन पाटील,अजय नेरपगारे,भरत काळे,दिलीप चौधरी,संतोष बोडखे,आमोल मापारी,संतोष सोहनी,जितेंद्र चौधरी,रामा आगे,राजेंद्र पाटील,भागवत थोटे, विजय गव्हाड,महेश चौधरी,सुरेश मनगटे,शिवाजी चौधरी,किशोर मापारी,आदिसह तालुक्यातील शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते.

# नुकसान झालेल्या शेतमालाची आ. अब्दुल सत्तार यांनी बांधावर जावून केली पाहणी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ ऑक्टोबर

सोयगाव तालुक्यात गेल्या ८ दिवसापासून सातत्याने होत असलेल्या परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतमालाची आमदार अब्दुल सत्तार यांनी शेताच्या बांधावर जावून पाहणी केली.यावेळी आ.अब्दुल सत्तार यांनी फर्दापूर,सोयगाव,कक्राळा गाव शिवारात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेवून त्यांना धीर दिला.



मुख्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे ज्यांची ई केवायसी प्रक्रिया झालेली आहे त्या पंचनामे झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात येत्या ३ दिवसांत नुकसान भरपाईचे अनुदान जमा होणार असून यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा धीर मिळणार असल्याचे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले.ज्या शेतकऱ्यांची ईकेवायसी बाकी आहे त्यांनी ईकेवायसी करून घ्यावी असे आवाहन देखील आमदार अब्दुल सत्तार यांनी केले आहे. नैसर्गिक आपत्तीत शेतकरी हवालदिल झालेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांनारब्बी पीक लागवडीसाठी आर्थिक मदत व्हावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.अब्दुल सत्तार म्हणाले. सोयगाव तालुक्यात शेतमाल सोबतच फळबागांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.


नुकसानग्रस्तांना शासकीय मदतीची नितांत गरज आहे त्यामुळे एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदती पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

नुकसानीची पाहणी करण्यासाठी आलेल्या आमदार अब्दुल सत्तार यांच्यासमोर शेतकऱ्यांनी टाहो फोडत शासकीय मदतीची याचना केली.नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेली परिस्थिती बाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना माहिती दिली असे सांगत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत राज्य सरकारची सकारात्मक भूमिका असल्याचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

या पाहणी दरम्यान नायब तहसीलदार संभाजी पाटील, गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड,तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांच्यासह जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे,माजी सभापती रामदास पालोदकर, सोयगाव शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,सयाजीराव वाघ,गोपीचंद जाधव,संतोष बोडखे, अक्षय काळे,उस्मान पठाण, योगेश पाटील,विलास वराडे, रवींद्र बावसकर,शेख मुक्तार,शेख जाकेर,समाधान काळे ,कदीर शहा,हर्षल काळे,जिवन पाटील,दिलीप देसाई , कुणाल राजपूत,सुरेश चव्हाण,भारत तायडे,राधेश्याम जाधव,गजानन कुडके,लतीफ शहा,सलीम पठाण,उमरखा पठाण,शफीक पठाण, आदिंसह परिसरातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# एमजीएम विद्यापीठ आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेयर्स अँड स्पोर्ट्स यांच्यामध्ये सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर, दि.२९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेयर्स अँड स्पोर्ट्स या दोन संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार एमजीएम विश्वस्त कार्यालय येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. हा करार 'विकसित भारत युवा संसद २०२६' स्पर्धेचे आयोजन करण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे.



या सामंजस्य कराराच्यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, उपकुलसचिव डॉ.परमिंदर कौर, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.आर.आर. देशमुख, जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे व सर्व संबंधित उपस्थित होते. यावेळी मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेयर्स अँड स्पोर्ट्स मंत्रालयाच्या वतीने जिल्हा युवक अधिकारी मेघा सनवाल तर एमजीएमकडून कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ.विलास सपकाळ म्हणाले, या करारांतर्गत एमजीएम विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना 'विकसित भारत युवक संसद २०२६' या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या स्पर्धेत वे वर्ष १८ ते २५ या वयोगटातील विद्यार्थी आपला सहभाग नोंदवू शकतात. एमजीएम विद्यापीठ विविध क्षेत्रातील संस्थांशी सामंजस्य करार करून विद्यार्थी हिताचे वेगगेगळे उपक्रम राबवित आले आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना संधीचे आणखी एक दालन खुले झाले आहे.

'विकसित भारत युवा संसद २०२६' ही स्पर्धा जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा ३ स्तरावर होत आहे. जिल्हास्तरीय स्पर्धा एमजीएम विद्यापीठात होणार असून 'फिफ्टी इयर्स ऑफ इमरजेंसी : लेसन्स फॉर इंडियन डेमोक्रेसी' या विषयावर विद्यार्थ्यांना आपले मत मांडायचे आहे. यातील १० विद्यार्थी राज्यस्तरावर आपले विचार मांडणार आहेत. तसेच या स्पर्धेतून निवड झालेले ३ विद्यार्थी शेवटच्या स्पर्धेसाठी दिल्ली येथील स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

स्पर्धेविषयी माहिती : युवकांना राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आणि त्यांच्या नेतृत्व कौशल्याला वाव देण्यासाठी 'विकसित भारत युवा संसद २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हे व्यासपीठ युवकांना देशाच्या विकासात आपली भूमिका स्पष्ट करण्याची संधी देणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शिक्षण घेणारे युवक संसदेसाठी शुक्रवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत माय भारत पोर्टल (ूलहरीरीं.सीं. ळप) वर नोंदणी करता येईल. ही स्पर्धा जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन टप्प्यांत होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातून १० प्रतिनिधी राज्य फेरीसाठी निवडले जातील, तर राज्य फेरीतील ३ विजेते राष्ट्रीय फेरीसाठी पात्र ठरतील.

# एका शेतकऱ्याने एका डॉक्टरां विषयी दाखवली आपुलकी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २९ ऑक्टोबर पैठण तालुक्यातील धुपखेडा गावातील एक शेतकरी गंगाधर तुळसे हे दिवाळीपूर्वी डॉ.सुरेश जंगले यांच्या वरद हॉस्पिटल आय सी यू,बिडकीन येथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत हॉस्पिटल मध्ये मोफत उपचार घेऊन सुखरूप बरे झाले .त्यांना या योजने मध्ये मिळालेले विनामूल्य सेवा व वरद हॉस्पिटल च्या सर्व डॉक्टर्स सर्व स्टाफ कर्मचारी यांनी दिलेल्या सेवेबद्दल व वागणुकीबद्दल दिवाळीचे अवचित्य साधून डॉक्टर्स व स्टाफला ड्रेस,साडी, तसेच हॉस्पिटल साठी घड्याळ भेट म्हणून दिले.खरच एका शेतकऱ्याचे मन किती मोठे असते हे तुळसे बाबांनी दाखवून दिले आणि एवढे मोठे मन फक्त शेतकऱ्याचेच असू शकते हेही दाखवून दिले.आपल्या कामाची किंमत ही पैशात नसते तर वागणुकीत आणि आपुलकीत असते आणि आज हाच अनुभव वरद हॉस्पिटल आणि टीमला तुळसे बाबांकडून अनुभवायला मिळाला. तुळसे तुमच्या या मोठे पणाला व मोठ्या मनाला वरद हॉस्पिटल तर्फे सलाम. हा क्षण वरद हॉस्पिटल आय सी यू च्या डायरी मध्ये एक सुवर्ण क्षण म्हणून लिहिला जाईल.



पुढील आयुष्यात रुग्ण आणि डॉक्टर हे नाते असेच बळकट राहावे व एकमेकांविषयी अशीच आपुलकी जोपासली जावी अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो.तसेच सर्व जनतेला आव्हान करतो की केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी बऱ्याच आजारांसाठी व त्यावर उपचार करण्यासाठी झचग-ध व चगझग-ध ही मोफत योजना सुरू केलेली आहे सर्व गरजू रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान करतो. ही योजना बिडकीन मध्ये वरद हॉस्पिटल आय सी यू येथे राबवली जाते आणि या योजनेअंतर्गत बऱ्याच आजारांवर मोफत उपचार केला जातो.यासाठी योजनेची माहिती घेण्यासाठी डॉ सुरेश जंगले व डॉ जागृती सुरेश जंगले वरद हॉस्पिटल आय सी यू.बिडकीन येथे संपर्क करावा. असे आव्हान करण्यात आले

## वेरूळ घृष्णेश्वर कथेमध्ये राम जन्माचा आनंदोत्सव मोठ्या उत्साहात हजारो भाविकाच्या उपस्थितीत संपन्न




खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ आज घृष्णेश्वर बारावे ज्योतिर्लिंग येथे चालू असलेल्या श्री राम कथा मानस चिरंजीव च्या चौथ्या दिवशी आजच्या सकाळच्या कथा सत्रामध्ये राम जन्माची कथा श्री रवींद्र पाठक( दादा) पुणे .यांनी आपल्या मधुर वाणीतून तुलसी रामायणाच्या आधाराने गायली श्रीराम हा आजन्म असला तरी भक्तांच्या प्रेमासाठी तो सगुण साकार होतो या तत्त्वाचा विस्तार त्यांनी कथेमध्ये केला.

सोबत संत साहित्य व अभंग, श्री रामाचा जप याची पुष्टी देत राम जन्माचा आनंद उत्सव उपस्थित हजारो भाविक भक्तांनी श्रीरामाच्या जय जयकार करून साजरा केला. यावेळी वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख साध्वी अक्का महाराज, यांचीही उपस्थिती होती ( दि २५ ऑक्टोंबर ते २ नोव्हेंबर नऊ दिवस कथेची वेळ सकाळी. साडेनऊ ते साडेबारापर्यंत . व सायंकाळी साडेपाच ते आठ या वेळेमध्ये होणार आहे ) कथेमध्ये उपस्थित असलेल्या श्रीराम भक्तांसाठी व संपूर्ण वेरूळ क्षेत्रामध्ये अन्नदानाचा संकल्प चैतन्य गोशाळा ट्रस्ट , च्या वतीने. मुख्य ट्रस्टी रवींद्र पाठक दादा.सौ हर्षदा पाठक , हिंदुराव पवार. नागनाथराव इनामदार , सचिन नाईक. यानी केला आहे व त्या दृष्टीने, हजारो भाविकांना अन्नदानातून प्रसाद वाटप मंदिर क्षेत्रामध्ये केला जात आहे.

## फर्दापूर परिसरात सलग आठ दिवसांपासून विजेच्या कडकडाटासह पाऊस कापूस मका यांना कोंब फुटले

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २९ फर्दापूर परिसरात सलग आठ दिवसांपासून विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडल्याने कापूस मका यांना कोंब फुटले



फर्दापूर. फर्दापूर परिसरात सलग आठ दिवसांपासून विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडल्याने शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान फर्दापूर ठाणा येथील शेतकरी गट नंबर ८१ पांडुरंग महिपत सोन्ने यांच्या शेतात तीन एकर मध्ये मका लागवड करण्यात आली होती परंतु त्यांनी मका काढण्यासाठी मकाचा गंज एक ठिकाणी शेतात लावून ठेवाल मात्र फर्दापूर परिसरात सलग आठ दिवसांपासून जोरदार पाऊस पडत असल्याने या मक्याच्या गंजी मध्ये मक्याच्या कणसात कोंब येत असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे याचं प्रमाण कापूस मातीमोल झाला असून यातही कोंब फुटण्याची सुरूवात झाली आहे यामुळे शेतकरी दोन्ही बाजूंनी आर्थिक संकटात सापडला आहे यात पिकं हि खराब झाली त्यात मालाचे भाव सुध्दा कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे यामुळे शेतकरी यांना आर्थिक मदत मिळावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत

# महिला सुरक्षिततेसाठी संवेदनशीलता महत्वाची -न्यायाधीश यु.टी. मुसळे

अहिल्यानगर, दि.२९ : महिलांचे अधिकार, महिलांचे सर्व क्षेत्रात असेलेले योगदान, महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार यावर महिलांनी जागृत असणे गरेजेचे आहे. आपले अधिकार व हक्क जोपासले तरच सुदृढ समाजाची निर्मिती होते, असे प्रतिपादन वरिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश यु. टी. मुसळे यांनी केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा अंजू शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि अहमदनगर बार आसोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला विधिज्ञ बार रूममध्ये कायदे विषयक जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी वरिष्ठ स्तर सह दिवाणी न्यायाधीश यु. टी. मुसळे बोलत होत्या.

यावेळी न्यायाधीश एम.डी.चऱ्हाटे, न्यायाधीश योगेश पैठणकर, ॲड. राजेश कातोरे, अध्यक्ष, ॲड. स्वाती पाटील, ॲड. निर्मला चौधरी आदी उपस्थित होत्या.

न्यायाधीश चऱ्हाटे म्हणाल्या, महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अत्याचारावर प्रतिबंध घालण्यासाठी 'विशाखा' ही अंतर्गत समिती स्थापन केलेली असते. या समितीच्या कामाबदल तसेच पोस्को, रॅगिंग प्रतिबंधक कायदा, माहिती-तंत्रज्ञान कायद्यातील महत्वाच्या तरतुदींची माहिती यावेळी देण्यात आली.

ॲड. अनिता दिघे यांनी प्रस्ताविक केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. अहमदनगर महिला बार असोसिएशनच्या सचिव ॲड. ज्योती हेमणे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव योगेश पैठणकर यांनी आभार मानले.

## खरडलेल्या जमिनी व बुजलेल्या विहीरींच्या दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य प्रस्ताव त्वरीत पाठवा- दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२९- अतिवृष्टीमुळे शेतजमिनी खरडल्या व विहीरी गाळाने बुजल्या व खचल्या. या जमिनींची व विहिरींची दुरुस्ती करता यावी यासाठी शासनाने अर्थसहाय्य देऊ केले आहे. ही कामे महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणार असून त्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी आपापल्या तालुक्यातील अर्थसहाय्य प्रस्ताव त्वरीत पाठवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी यांची आज दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. दोन्ही प्रकारच्या नुकसानीत अनुज्ञेय अर्थसहाय्य देण्यासाठी शासनाच्या नियोजन विभाग (रोहयो प्रभाग) शासन निर्णय अनुक्रमे दि.१० व दि.१३ ऑक्टोंबर रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

त्यानुसार खरडलेल्या जमिनी लागवड करण्यायोग्य दुरुस्त करुन देण्याचे कामे महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेतून करावयाची आहेत. त्यासाठी लहान व सीमांत शेतकरी (कमाल मर्यादा २ हेक्टर) यांच्या जमिनींची दुरुस्ती करण्यात येणार आहे.त्यासाठी संबंधित बाधीत शेतकऱ्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे सातबारा व खातेउतारा यांच्याप्रतिसह लेखी अर्ज करावयाचा आहे. तांत्रिक अधिकारी पाहणी करुन कामनिहाय अंदाज पत्रक तयार करण्यात येईल.या अंदाजपत्रकांना कृषी विस्तार अधिकारी किंवा शाखा अभियंता तांत्रिक मान्यता प्रदान करतील व गटविकास अधिकारी यांच्यामार्फत हे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे आल्यावर एकूण खर्चास मान्यता प्रदान करतील. या कामांसाठी अंदाजपत्रकिय रक्कम जास्तीत जास्त ३ लाख रुपये प्रति हेक्टर या मर्यादेत व २ हेक्टर कमाल मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत अनुज्ञेय राहतील. तसेच खचलेल्या व बुजलेल्या विहीरींसाठी प्रति विहिर कमाल मर्यादा ३० हजार रुपये अनुज्ञेय असेल. या कामांची प्रक्रिया सर्व यंत्रणांनी तातडीने राबवावी व शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचवावी. ज्या शेतकऱ्यांकडे जॉब कार्ड नाही त्यांचे जॉब कार्ड काढून त्यांना योजनेचा लाभ द्यावयाचा आहे.त्यादृष्टिने त्वरीत अनुदान मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com






बीड जिल्ह्यात गेल्या दोन चार दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे कपाशीची पिकाची अशी नासाडी झाली आहे सततच्या पावसामुळे कापूस भिजल्यामुळे शेतकरी अशा पद्धतीने वाळवीत आहेत (छाया कृष्णा शिंदे)

# अंबाजोगाई तालुक्यात मुसळधार पाऊस ; सोयाबीनचे ढिग पाण्यात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ ऑक्टोबर**

अंबाजोगाई तालुक्यात मंगळवारी सायंकाळपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी काढलेले सोयाबीन शेतात किंवा अंगणात सुकवण्यासाठी ठेवलेले असताना अचानक आलेल्या पावसामुळे हे सर्व ढिग पाण्यात भिजले आहेत.





पावसामुळे शेतातील पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, काही ठिकाणी नाल्यांना पूर आला आहे. गावोगावी शेतकरी आपल्या साठवलेल्या सोयाबीनला वाचवण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत.पावसामुळे शेतातील पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, काही ठिकाणी नाल्यांना पूर आला आहे. गावोगावी शेतकरी आपल्या साठवलेल्या सोयाबीनला वाचवण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत.अंबाजोगाई तालुक्यातील काही परिसरात रब्बी पेरणी सुद्धा पुर्ण झालेली आहे. व पाऊस जास्त झाल्यामुळे कोवळी पिके वाया जाण्याची शक्यता दिसून येत आहे. तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेती आणि जनजीवन दोन्ही विस्कळीत झाले आहे. शेतातील पिके पाण्यात बुडाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सोयाबीन, मूग, उडीद, तूर आणि कापूस या पिकांना फटका बसला असून अनेक शेतकऱ्यांचे तयार उत्पादन पावसामुळे नष्ट झाले आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना देखील अडचणींचा सामना करावा लागत आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवस पावसाची शक्यता राहणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अंबाजोगाईतील दोन मटका चालकांची एमपीडीए अंतर्गत हसूल कारागृहात रवानगी

**जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा अवैध जुगार चालकांना दणका**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ ऑक्टोबर**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी, अवैध मटका जुगार व गुंडगिरीवर आळा घालण्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी संयुक्त मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत अंबाजोगाई शहरातील दोन कुख्यात मटका चालकांविरोधात एमपीडीए (Maharashtra Prevention Of Dangerous -ctivities -ct) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे.





पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शरद जोगदंड यांनी सय्यद अन्वर सय्यद अजगर (वय ४१, रा. खतीब गल्ली, अंबाजोगाई) आणि चाँद इमाम गवळी (वय ४४, रा. गवळीपुरा, अंबाजोगाई) या दोघांविरोधात एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव तयार करून जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सादर केला होता. तपासानंतर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी आदेश जारी करत दोन्ही आरोपींना तात्काळ ताब्यात घेण्याचे निर्देश दिले.

पोलीसांच्या गुप्त माहितीवरून दोन्ही आरोपींना २ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेण्यात आले आणि २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.४५ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. या दोन्ही आरोपींविरुद्ध अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलीस ठाण्यात मटका जुगार खेळवणे, धमक्या देणे, शिवीगाळ करणे यासारख्या गंभीर गुन्ह्यांची सहा प्रकरणे नोंदवली गेली आहेत. दोघांवर कलम ११० सीआरपीसी अंतर्गत पूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई झाली होती, मात्र त्यांचे वर्तन न सुधारल्याने ही कठोर पावले उचलण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भापोसे), अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे य मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, शरद जोगदंड यांनी संयुक्तरीत्या केली.

अंमलबजावणीत स्थागुशा बीडचे पथक सहभागी झाले होते.पोलीस अधीक्षक काँवत यांनी सांगितले की, भविष्यात अवैध जुगार, गुटका विक्री, वाळू माफिया, काळाबाजार करणारे तसेच सामाजिक तणाव निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरोधात चझऊ- व चउजउ- कायद्या अंतर्गत कठोर कारवाई सुरूच राहील.

# छत्रपती साखर कारखान्याचा १२ वा गळीत हंगामास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ ऑक्टोबर**

माजलगाव तालुक्यातील छत्रपती सहकारी



साखर कारखाना लि., सोनाजीनगर याचा २०२५-२६ चा बाराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ मंगळवारी कारखान्याचे चेअरमन मा. आ. बाजीराव (भाऊ) जगताप व व्हा. चेअरमन मोहनराव जगताप तसेच शेतकऱ्यांच्या शुभहस्ते गव्हाणीत मोळी टाकून पार पडला.

यावेळी बोलताना चेअरमन जगताप म्हणाले की, छत्रपती साखर कारखाना हा नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारा कारखाना आहे. इतर कारखान्यांपेक्षा आम्ही ऊसाला अधिकचा दिलेला आहे. यंदा पावसाचे प्रमाण चांगले असल्याने ऊस लागवड खुप मोठ्या प्रमाणात झाली आहे. छत्रपती कारखाना हा एकाही शेतकऱ्याचा ऊस शेतात शिल्लक ठेवणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस छत्रपती कारखान्याकडेच गाळपासाठी आणावा.

व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी सांगितले की, गेल्या अकरा हंगामांप्रमाणे यंदाही छत्रपती कारखाना शेतकऱ्यांना योग्य भाव देणार. शेतकऱ्यांचा विश्वास आमची ताकद आहे. तसेच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाला कारखान्याचे संचालक, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी, ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार, पत्रकार, नेते मंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पदवीधर यांनी तात्काळ मतदान नोंदणी करावी नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ ऑक्टोबर**



पदवीधर यांनी तात्काळ आपली मतदार यादी मध्ये नाव नोंदणी संबंधित निवडणूक विभागामध्ये जाऊन करावी नोंदणीसाठी लागणारे डॉक्युमेंट आधार कार्ड पॅन कार्ड पास साईज फोटो हे सर्व सोबत घेऊन निवडणूक विभागामध्ये जावे व आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून केले आहे येणाऱ्या भविष्य काळामध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी या नोंदणीचा फायदा पदवीधरांना मतदान करण्यासाठी व आपल्या भारतीय जनता पार्टीचा निवडणूक उमेदवार निवडून देण्यासाठी याचा फायदा होईल म्हणून सर्व पदवीधर यांनी तात्काळ आपली नाव नोंदणी मतदान यादीमध्ये करावी असे आव्हान भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

# ६ नोव्हेंबरपर्यंतच संधी : पदवीधर मतदार संघ नोंदणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ ऑक्टोबर**

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी बीडसह संपूर्ण विभागातील पात्र पदवीधर मतदारांना आवाहन केले आहे की , विधान परिषद पदवीधर मतदार संघासाठी नाव नोंदणी प्रक्रिया सुरू असून अंतिम मुदत ६ नोव्हेंबर २०२५ जवळ आली आहे . त्यामुळे संबंधित मतदार संघ हद्दीत किमान ३ वर्षांचे वास्तव सिद्ध होते , अशा सुशिक्षित नागरिकांनी त्वरित अर्ज करणे आवश्यक आहे .

जिल्हा स्तरावर या प्रक्रियेचे मार्गदर्शन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तर सतत आढावा उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी आणि उपविभागीय अधिकारी करिता जाधव घेत आहेत . तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांच्या पुढाकारातून तहसील कार्यालयात मदत केंद्र सुरू करण्यात आले असून जनजागृतीसाठी ग्रामपातळीवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे .

पदवीधर मतदार संघ हा विशेषत : सुशिक्षित समाजाचा राजकारणातील सहभाग वाढवण्यासाठीची व्यवस्था आहे . विधान परिषदेमध्ये शिक्षण , कौशल्य विकास , युवा विषयक प्रश्न , अभ्यासकांचे अधिकार आणि सामाजिक प्रगतीशी निगडित मुद्दे मांडण्यासाठी पदवीधरांचे प्रतिनिधी निवडले जातात . त्यामुळे समाजातील सुशिक्षित घटकांचा आवाज थेट धोरणनिर्मितीपर्यंत पोहोचण्यास मदत होते .

अर्जासाठी पदवी प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिका , आधार किंवा पॅन किंवा पासपोर्ट यापैकी ओळख पुरावा , विज



बिल किंवा रेशनकार्ड किंवा भाडेकरार किंवा मालकी हक्क कागदपत्र असा राहत्या पत्त्याचा पुरावा आणि लागू असल्यास रोजगार किंवा व्यवसाय पुरावा आवश्यक आहे . सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती राजपत्रित अधिकारी अथवा महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा संस्थाप्रमुख यांनी करणे बंधनकारक आहे .

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की गठ्ठा पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत . प्रत्येक अर्जदाराने स्वतःचा अर्ज स्वतंत्ररित्या सादर करावा . चुकीची माहिती किंवा अपूर्ण कागदपत्रांमुळे अर्ज नामंजूर केला जाईल आणि खोट्या कागदपत्रांवर कायदेशीर कारवाई होईल . अर्ज तपासणीदरम्यान मूळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे .

घरबसल्या नोंदणी करण्यासाठी निवडणूक विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध असून मोबाईल क्रमांक नोंदणी आणि एक वेळ संकेतसंख्या पडताळणी करून छायाचित्र , स्वाक्षरी आणि आवश्यक कागदपत्रांची प्रती अपलोड केल्यावर अर्ज सादर करता येतो . डिजी लॉकरमधून कागदपत्रे मिळविण्याची सोयही उपलब्ध असल्याने नागरिकांना कार्यालयात वारंवार चकरा मारण्याची आवश्यकता नाही.

बीड जिल्ह्यात सुमारे ५० हजार पात्र पदवीधर असण्याचा अंदाज असून अजूनही मोठ्या प्रमाणावर नाव नोंदणी बाकी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे . महिलांसाठी आणि दिव्यांग मतदारांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत . विविध महाविद्यालयांनी माजी विद्यार्थ्यांशी संपर्क वाढवून अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शन सुरू केले आहे . स्वयंसेवक पथकांमार्फतही ग्रामीण भागात जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

मतदानाचा हक्क हा केवळ अधिकार नसून घटनेने दिलेले कर्तव्य आहे . पदवीधरांनी एकही दिवस दवडू न देता तात्काळ नाव नोंदणी करावी . सुशिक्षित समाजाचा लोकशाहीतील सहभाग अधिक प्रभावीपणे वाढवणे ही सर्वांची जबाबदारी आहे .

- विवेक जॉन्सन , जिल्हाधिकारी , बीड

तहसील कार्यालयात अर्ज सादर करण्याची सुविधा शासकीय सुट्टी वगळता दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ उपलब्ध आहे . अंतिम मुदत लक्षात घेऊन नागरिकांनी तात्काळ नोंदणी करावी , असे प्रशासनाचे आवाहन आहे .

# लोकसंचालित साधन केंद्र १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ ऑक्टोबर**

दि. १९ ऑक्टोबर २०२५रोजी औटी मंगल कार्यालय, जालना रोड, बीड येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसंचालित साधन केंद्र, बीड यांची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी. च्या अध्यक्षा कालिंदा दिनकर खांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. स्वागत प्रस्तावना तसेच वार्षिक अहवाल व लेखापरीक्षण अहवालाचे सादरीकरण व्यवस्थापक सविता सखाराम औटे यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन आय.सी.आय.सी.आय. बँकेचे आर.एच.एस. संतोष पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी महिलांसाठी उपलब्ध विविध बँकिंग योजना, सूक्ष्म वित्त, बचत व गुंतवणुकीचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. सभेस कृषी विभागाचे जाधवर कृषी विभाग आत्माचे सुरेश पाटील, सखी वन स्टॉप सेंटरच्या शांता खांडेकर, आय.सी.आय.सी.आय. बँकेचे नारायण बंडे, सी.एम.आर.सी. सचिव राजाभाऊ मस्के तसेच लोकसंचालित साधन केंद्राचे मानद सल्लागार व माविम जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप उपस्थित होते.

तसेच सी.एम.आर.सी. पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व विविध बचत गट समूहांच्या महिला प्रतिनिधींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमात कृषी विभागाचे जाधवर यांनी महिला बचत गटांची कामगिरी, कृषी संबंधित योजना, पीकवाढ आणि कर्जसुविधांबाबत मार्गदर्शन केले. शांता खांडेकर यांनी महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांबद्दल मार्गदर्शन केले. कृषी विभाग आत्माचे सुरेश पाटील यांनी महिला उद्योजकतेस प्रोत्साहन देत बचत गट,उद्योग नोंदणी, कर्जसुविधा आणि कृषी व्यवसायातील सुधारणा याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी GTM कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमात उत्कृष्ट उद्योजिका, उत्कृष्ट सहयोगिनी व उत्कृष्ट स्टाफ सदस्यांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट महिला बचत गटांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी कार्यकारी मंडळ व स्टाफ यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कालिंदा दिनकर खांडे यांनी केले.

या वार्षिक सभेमार्फत बचत गटाच्या महिलांनी आत्मनिर्भरतेचा संकल्प दृढ केला. महिलांच्या सामाजिक, आर्थिक व उद्योजकीय विकासासाठी माविम व लोकसंचालित साधन केंद्राचे योगदान उल्लेखनीय असल्याचे सर्व उपस्थितांनी नमूद केले. या मेळाव्याने महिलांना प्रोत्साहन, प्रेरणा आणि सशक्ततेचा नवा आत्मविश्वास दिला.

## अग्रलेख...

# लोकतंत्राच्या सबलीकरणासाठी...

*'यथा चतुर्भीः कनकं परीक्ष्यते, निघर्षणच्छेदनतापताडनैः।*
*तथा चतुर्भीः पुरुषः परीक्ष्यते, त्यागेन शीलेन गुणेन कर्मणा ॥'*

आचार्य चाणक्य नीतीतील या विचारांमधून कोणतेही कार्य यशस्वी होण्यासाठी त्याच्या कार्यारंभापूर्वी आणि कार्य चालू असताना सातत्याने विचारपूर्वक निर्णय घेणे अर्थात, पुनरीक्षण करणे किती महत्त्वाचे असते हे अधोरेखित होते. निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांच्या 'विशेष सघन पुनरीक्षण' अर्थात 'एसआयआर'ची (स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन) केलेली घोषणा या दृष्टिकोनातून फार महत्त्वाची असून त्यास लोकशाहीच्या सबलीकरणाचे स्वागतार्ह पाऊल म्हटले पाहिजे. मतदारांची यादी म्हणजे लोकशाहीचा आरसा असतो. त्यामुळेच निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी या याद्यांचे पुनरीक्षण केले जाते. अन्य सुधारणाही केल्या जात असतात. या नियमित प्रक्रियांपेक्षाही अधिक सखोल आणि वेळमर्यादा असलेला 'विशेष सघन पुनरीक्षण' कार्यक्रम हाती घेतला गेला आहे आणि म्हणून तो चर्चेचा विषय आहे. खरे तर, या कार्यक्रमाचे स्वागत भारतातील साऱ्या राजकीय पक्षांनी मोठ्या उत्साहाने करायला हवे होते. पण काँग्रेस आणि द्रमुकने (डीएमके) त्यावर आक्षेप नोंदविला. मतदार याद्यांमध्ये त्रुटी आहेत, अशी ओरड आधी बेंबीच्या देठापासून करायची, मतचोरीचा कांगावा करायचा आणि जेव्हा मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाचा असा व्यापक कार्यक्रम राबविण्यासाठी स्वतः निवडणूक आयोग सकारात्मक पाऊल टाकतो तेव्हा त्याला विरोध करायचा हा दुटप्पीपणा काँग्रेससारखे पक्ष करतात. त्यांचा हा पवित्रा म्हणजे राजकारणापलीकडे काहीच नसते, हे समजून घेतले पाहिजे.

'एसआयआर' म्हणजे मतदारयाद्यांमध्ये असलेल्या त्रुटी, विसंगती आणि अनियमितता दूर करण्यासाठी हाती घेतलेला महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत घरोघरी जाऊन तब्बल ५१ कोटी मतदारांची फेरतपासणी केली जाणार आहे. जन प्रतिनिधित्व कायद्याच्या (१९५०) कलम २१ अंतर्गत आयोगाला अशा विशेष पुनरीक्षणाचा अधिकार आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु, यादीत नाव नसलेल्या, सर्व पात्र मतदारांची नोंदणी करणे तसेच मृत झालेले, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेले किंवा कायद्यानुसार अपात्र ठरलेल्या मतदारांची नावे याद्यांमधून गाळणे हा त्यातील महत्त्वाचा भाग. त्याबरोबर वारंवार स्थलांतरामुळे अनेक ठिकाणी नोंदणी झालेल्या मतदारांची नावे शोधून तुंबलेली यादी सुरळीत करणे, मतदारयाद्यांची 'अखंडता' जपणे आणि त्या 'त्रुटी-मुक्त' झाल्याचे सुनिश्चित करणे असा या 'एसआयआर'चा उद्देश आहे. त्यामुळे या कामावर कुणाचाही आक्षेप असण्याचे कारणच नाही. तसे कुणी करीत असेल तर त्यांच्या हेतूवरच आक्षेप नोंदविला गेला पाहिजे. कारण मुक्त आणि न्यायपूर्ण निवडणुकांसाठी मतदारयादीची शुद्धता हा महत्त्वाचा भाग आहे. शिवाय, 'एसआयआर' हा 'एक व्यक्ती, एक मत' या तत्त्वाला बळकटी देणारा कार्यक्रम आहे. मागे वळून पाहिले तर असे दिसते की, स्वातंत्र्यानंतर भारतात आतापर्यंत किमान नऊ वेळा असे 'एसआयआर' राबविण्यात आले. शेवटचे मोठे राष्ट्रव्यापी विशेष सघन पुनरीक्षण २००२ ते २००४ या काळात झाले होते. आता पुन्हा निवडणूक आयोगाने राष्ट्रीय स्तरावर 'एसआयआर' सुरू करण्याची घोषणा केली आहे. साधारणपणे दोन दशकांनंतर इतक्या मोठ्या प्रमाणात हे पुनरीक्षण होत आहे. प्रायोगिक तत्त्वावर नुकताच बिहार राज्यात या प्रक्रियेचा एक टप्पा यशस्वीरीत्या पूर्णही झाला आणि त्याबाबत कोणत्याही तक्रारी आल्या नसल्याचे केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्पष्ट केले आहे. आता दुसऱ्या टप्प्यात, २०२६ तसेच २०२७ मध्ये विधानसभा निवडणूक होत असलेल्या राज्यांचा समावेश केला जाणार आहे. पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, गुजरात, छत्तीसगड, राजस्थान, अंदमान-निकोबार, लक्षद्वीप, पुडुचेरी ही १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात आहे. विशेष नागरिकत्व पडताळणी कायद्यामुळे आसामचा यात समावेश नाही. महाराष्ट्र राज्यही त्यात नाही. त्यामुळे अगदी पुढ्यात असलेल्या येथील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा मार्गही मोकळा झाला आहे. नेमका आक्षेप काय, हे त्यामुळेच संशयाचे ठरते.

तत्त्वतः 'एसआयआर' खूप आवश्यक आणि योग्य आहे. वाढते शहरीकरण, सततचे स्थलांतरण आणि मृत्यूची नोंद न होणे यासारख्या कारणांमुळे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी कायम राहतात. त्या वाढत जातात. हे तसे स्वाभाविकही आहे. परंतु, वास्तव असे की, अशा त्रुटींमुळे मतदानावर परिणाम होऊ शकतो. 'घोस्ट वोटर्स' किंवा दुबार नावे वगळल्याने लोकशाही प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास वाढतो, जो आजच्या राजकीय पृष्ठभूमीवर आवश्यक आहे. बिहारमध्ये नुकत्याच झालेल्या 'एसआयआर'मध्ये सुमारे ४२ लाख नावे वगळण्यात आली आणि अनेक नव्या पात्र मतदारांची नोंदणीही झाली. ही आकडेवारी या प्रक्रियेची गरज दर्शवते.

'एसआयआर' ही प्रक्रिया चांगली असली, तरी तिची अंमलबजावणी अत्यंत बारकाईने करावी लागते. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात म्हटले आहे की, निवडणूक आयोगाचा अधिकार व्यापक आहे. पण त्याचा वापर करताना अचूकता आणि समावेशकता यांचा समतोल साधला गेला पाहिजे. निवडणूक आयोगाने तशी काळजी घेणे आवश्यकही आहे. कारण विरोधकांकडून 'राजकीय हेतू'ने प्रेरित असल्याचा आरोप होणार आहे. ते त्यांचे कामच आहे. विरोधी पक्षाच्या एका नेत्याने तर 'एक्स'वर म्हटले आहे की, आजकाल सरकार मतदारांची निवड करते! खरे तर, हा थेट आयोगाच्या भूमिकेवरच हल्ला आहे. असे बेजबाबदारपणाचे वक्तव्य देशाच्या लोकशाहीला घातक आहे, हे कुणीतरी अशा नेत्यांना समजावून सांगितले पाहिजे. 'एसआयआर'मुळे येत्या निवडणुकांच्या प्रक्रियेत गुणात्मक आणि संख्यात्मक असे दोन्ही बदल होणे अपेक्षित आहे. मतदार याद्या अधिक स्वच्छ झाल्याने 'अपात्र' मतदारांची संख्या कमी होईल आणि 'पात्र' मतदार वाढतील. त्यामुळे मतदानाची टक्केवारी अधिक विश्वसनीय होईल. दुबार मतदान आणि 'बोगस वोटिंग'च्या घटना कमी होतील आणि निवडणुकीची विश्वासार्हता वाढेल तसेच लोकशाही प्रक्रिया अधिक न्यायपूर्ण होईल. उदाहरणार्थ, जर एखाद्या मतदारसंघातील 'स्थलांतरित' मतदारांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली, तर त्या भागातील स्थानिक उमेदवारांच्या निवडणूक प्रचार धोरणातही यथायोग्य बदल होऊ शकतो. 'एसआयआर'चे दूरगामी परिणाम भारतीय लोकशाहीवर होतील, यात शंका नाही. 'एसआयआर'च्या नियमित अंमलबजावणीमुळे भविष्यातील मतदार याद्यांतील शुद्धी टिकवून ठेवण्यास मदत होईल आणि त्यामुळे लोकशाही प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास वाढत राहील. निवडणूक ही प्रक्रिया समाजातील मते-मतांतरे व सहमती-असहमतीची दखल घेण्यासाठीच पार पाडली जाते. निवडणुकीची प्रक्रिया हे लोकशाहीतील एक प्रकारचे अमृत मंथन असते. या मंथनातून जे बाहेर येते ते जनतेसाठी आणि लोकशाहीच्या सबलीकरणासाठी फायदेशीर ठरत असेल तर त्यावर आक्षेप घेण्याचे कारणच उरत नाही. याउपर काही तक्रारी असल्यास त्या नोंदविण्याचा पूर्ण अधिकार विरोधकांनाच नव्हे, तर सर्व नागरिकांनादेखील आहे. परंतु, मुळात मतदार यादीच्या पुनरीक्षणाची प्रक्रियाच होऊ नये, हा दुराग्रह आणि अशी प्रक्रिया कुणाच्या तरी फायद्यासाठी आहे, हा आरोप या दोन्ही गोष्टी पूर्णपणे चुकीच्या ठरतात. ही बाब साऱ्यांनी लक्षात घ्यावी की, लोकशाही केवळ मतदानातून नव्हे, तर मतदारांच्या अचूक नोंदीतूनही बळकट होत असते. 'एसआयआर' हा भारताच्या निवडणूक प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण आणि अत्यंत आवश्यक असा टप्पा आहे. हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर तो देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या संवैधानिक अधिकाराशी जोडलेला विषय आहे. निवडणूक आयोगाने या प्रक्रियेत जास्तीत जास्त पारदर्शकता, राजकीय पक्षांचा सक्रिय सहभाग आणि वंचित घटकांच्या नावनोंदणीत मदत करून ही मोहीम यशस्वी करावी. जर हा कार्यक्रम कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि सर्वसमावेशकतेच्या भावनेने राबविला गेला, तर तो निश्चितच भारतीय लोकशाहीच्या सबलीकरणासाठी 'गेम चेंजर' ठरू शकतो, यात शंका घेण्याचे कारणच नाही.

---

## विशेष

# पायाभूत सुविधा आणि आव्हाने

**प्रा. सुखदेव बखळे**

देश अभूतपूर्व वेगाने पायाभूत सुविधांमध्ये वाढ अनुभवत आहे. महामार्गांच्या जलद विस्तारापासून विमानतळ, रेल्वेमार्ग आणि स्मार्ट शहरांच्या विकासापर्यंत वाहतूक आणि शहरी प्रणालींचे आधुनिकीकरण करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहे. तथापि, कोणत्याही मोठ्या प्रमाणात विकासाला असंख्य आव्हानांना तोंड द्यावे लागते. भारताचा विविध भूभाग पायाभूत सुविधांच्या विकासात एक मोठा अडथळा आहे. उत्तरेकडील खडकाळ आणि डोंगराळ प्रदेशांपासून दक्षिणेकडील पूरप्रवण मैदानांपर्यंत कंत्राटदारांना विविध वातावरणात माती स्थिर करण्याचे सतत आव्हान असते. भूस्खलनाच्या शक्यता असलेल्या भागात, मातीची धूप भिंती कमकुवत करू शकते आणि धोकादायक कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते. स्टीलसारख्या पारंपरिक बांधकाम साहित्यात, विशेषतः भारताच्या किनारी आणि दमट प्रदेशात गंज ही एक मोठी समस्या आहे. गंज केवळ सामग्रीची ताकद कमी करत नाही तर दीर्घकालीन देखभाल खर्चदेखील वाढवते. स्टीलऐवजी पॉलिमरिक स्ट्रॅप्स गंजण्यास अत्यंत प्रतिरोधक असतात. त्यामुळे ते किनारी आणि दमट वातावरणात वापरण्यासाठी आदर्श बनतात. हे स्ट्रॅप्स पॉलिथिलीन किंवा पॉलिस्टरसारख्या सामग्रीपासून बनवले जातात, जे मातीमध्ये आढळणाऱ्या ओलावा किंवा रसायनांमुळे प्रभावित होत नाहीत. हा टिकाऊपणा सुनिश्चित करतो की, अक्षय ऊर्जा आणि सूक्ष्म आणि लघु उद्योग (एमएसई) भिंतींसारखे पायाभूत सुविधा प्रकल्प महागड्या गंज उपचार किंवा बदलीशिवाय दशकांपर्यंत त्यांची संरचनात्मक अखंडता टिकवून ठेवतात. परिणामी पॉलिमरिक स्ट्रॅप्स दीर्घकाळात अधिक किफायतशीर ठरतात.

प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पात वेळ आणि बजेट मर्यादा हे एक सामान्य आव्हान आहे. कामगारांची कमतरता, साहित्याची उपलब्धता आणि अनपेक्षित जमिनीच्या परिस्थितीमुळे होणारा विलंब खर्च वाढवू शकतो. भारत अनेक सक्रिय टेक्टोनिक प्लेट्सवर वसलेला आहे. संरचना योग्यरीत्या मजबूत न केल्यास आपत्तिजनक नुकसान होऊ शकते. पॉलिमरिक स्ट्रॅप्समध्ये भूकंपाच्या क्रियाकलापांमुळे निर्माण होणारी शक्ती शोषून घेण्याची आणि वितरित करण्याची अद्वितीय क्षमता असते. त्यांची लवचीकता संरचनांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय जमिनीच्या हालचालीदरम्यान किंचित वाकण्याची परवानगी देते. यामुळे ते भूकंपप्रवण भागात विशेष प्रभावी बनतात. काँक्रिट आणि स्टीलसारख्या पारंपरिक साहित्यांमध्ये उच्च कार्बन फूटप्रिंट असते आणि प्रकल्पाच्या जीवनचक्राच्या



शेवटी त्यांचा पुनर्वापर करणे कठीण होऊ शकते. पॉलिमरिक स्ट्रॅप्स पारंपरिक साहित्याला अधिक शाश्वत पर्याय देतात. त्यांच्या उत्पादनात स्टीलपेक्षा कमी कार्बन फूटप्रिंट आहे आणि प्रकल्पाच्या जीवनचक्राच्या शेवटी त्यांचा पुनर्वापर करणे सोपे आहे.

पॉलिमरिक पट्ट्या अधिक टिकाऊ असल्याने आणि कालांतराने कमी देखभालीची आवश्यकता असल्याने, ते भविष्यातील साहित्य उत्पादन आणि बदलण्याची आवश्यकता कमी करतात. त्यामुळे पर्यावरणीय शाश्वततेत आणखी योगदान मिळते. 'नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईपलाईन' (एनआयपी) अनेक बाबतीत नियोजन आयोगाच्या पंचवार्षिक योजनेशी साम्य आहे. कारण त्यात देशासाठी पाच वर्षांच्या क्षेत्रनिहाय गुंतवणूक योजनेची रूपरेषादेखील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात 'एनआयपी'ची घोषणा केली होती. 'एनआयपी' तयार करण्यासाठी आर्थिक व्यवहार सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्यात आला होता. २०२१ ते २०२५ या आर्थिक वर्षांसाठी टास्क फोर्सचा अंतिम अहवाल २९ एप्रिल २०२० रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी प्रसिद्ध केला. 'एनआयपी'मध्ये समाविष्ट असलेला प्रत्येक प्रकल्प १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणुकीचा आहे.

'एनआयपी'मध्ये प्रस्तावित केलेली सुरुवातीची गुंतवणूक आणि डेटा सादर करण्याची आणि अपडेट करण्याची सध्याची पद्धत यांच्यातील संरेखन कठीण आहे. 'एनआयपी'च्या प्रगतीचा मागोवा घेणारे 'इंडिया इन्व्हेस्टमेंट ग्रीड पोर्टल' त्वरित अपडेट होते. त्यात १६८.९३ लाख कोटी गुंतवणूक करण्याचे नियोजन आहे. तथापि, 'उपलब्धी'चे आकडे सुरुवातीला आश्चर्यकारक आहेत. ११ मार्च २०२५ पर्यंत एकूण ३१.१ लाख कोटी रुपये गुंतवले गेले होते, जे सुरुवातीच्या १११ लाख कोटी रुपयांपैकी फक्त २८ टक्के आहे. ६१ टक्के प्रकल्प अजूनही अंमलात आणले जात आहेत. त्याची किंमत ८३.७५ लाख कोटी रुपये आहे. पायाभूत सुविधा प्रकल्पांची संकल्पना, डिझाईन आणि अंमलबजावणी चार वर्षांपेक्षा जास्त काळ घेते. त्यामुळे अपूर्ण प्रकल्प प्रत्यक्ष भांडवली गुंतवणूक म्हणून गणले जाणे योग्य आहे. यामुळे एकूण ११५ लाख कोटी रुपये गुंतवणूक होईल. हे मूळ योजनेच्या १०३ टक्के आहे. हा आकडा केंद्र, राज्य, बिगर-अर्थसंकल्पीय संसाधने आणि खाजगी क्षेत्रातील पायाभूत सुविधा गुंतवणुकीसाठीच्या २० लाख कोटींच्या वार्षिक अंदाजाशी जुळतो. एकूण पायाभूत सुविधा गुंतवणुकीपैकी सार्वजनिक क्षेत्राचा वाटा अंदाजे ८० टक्के आहे. म्हणून खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे अत्यंत महत्त्वाचे होते. हे लक्षात घेऊन, २०२१ च्या सुरुवातीला राष्ट्रीय मुद्रीकरण पाईपलाईन (एनएमपी) लाँच करण्यात आली.

'एनआयपी'सोबत त्याचे एकत्रीकरण सर्व विद्यमान सरकारी मालकीच्या पायाभूत सुविधा मालमत्ता खाजगी क्षेत्राला अंशतः किंवा पूर्णपणे विकण्याचे उद्दिष्ट ठेवते. हे काम चार वर्षांमध्ये पार पाडायचे असून सहा लाख कोटी उभारण्याचे उद्दिष्ट आहे. २०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, 'एनएमपी'चे निकाल खूपच उत्साहवर्धक आहेत. सरकारने याद्वारे आतापर्यंत ३ लाख ८६ हजार कोटी उभारले आहेत. त्यात रस्ते, वीज, कोळसा आणि खाण क्षेत्रांचा सर्वाधिक वाटा आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये 'एनएमपी'द्वारे आणखी १ लाख ९१ हजार कोटी रुपये उभारण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. नीती आयोग पायाभूत सुविधांच्या मुद्रीकरणासाठी पंचवार्षिक योजना तयार करत आहे. 'एनएमपी'चे नूतनीकरण करण्यासाठी नवी उद्दिष्टे समाविष्ट केली जाण्याची अपेक्षा आहे. महामार्ग, सौर आणि पवन ऊर्जाक्षेत्रात महत्त्वपूर्ण गुंतवणूक सुरूच राहील, तर पंप केलेल्या साठवण प्रकल्पांमध्ये आणि ट्रान्समिशन आणि वितरण नेटवर्कमध्ये नवी गुंतवणूक वेगाने येईल. शिवाय, पुढील 'एनआयपी' आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण, डिजिटल पायाभूत सुविधा आणि शेती यासारख्या सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीवर अधिक भर देण्याची शक्यता आहे. असे असले, तरी पुरेशी तरतूद, गतीने भूसंपादन, कामाची गती आणि दर्जा तसेच भ्रष्टाचारावर नियंत्रण ही आव्हाने कायम आहेत. त्यावर मात करण्याचे आव्हान सत्ताधाऱ्यांपुढे आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

---

## वेध

**विजय निचकवडे**

# न्यायालय गंभीर, पण नोकरशाही नाही

लालफीतशाहीत अडकलेली व्यवस्था आणि त्या व्यवस्थेमुळे सामान्यांना होणारा मनस्ताप बरेचदा अनुभवास येतो. थोडा जिवाचा त्रागा करून घेतल्यानंतर आम्ही त्या व्यवस्थेशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो. मात्र, लालफीतशाहीचा अनुभव सर्वोच्च न्यायालयाला आला अन् न्यायालयाने देशातील राज्य सरकारांनाच फटकारले. प्रशासकीय यंत्रणेच्या दृष्टीने भटक्या कुत्र्यांचा विषय अगदी क्षुल्लक असेलही कदाचित; पण सामान्यांच्या दृष्टीने तेवढाच जिव्हाळ्याचा आणि जटिल असल्याचे न्यायालयाच्या लक्षात आले असावे, पण राज्य शासनातील बड्या अधिकाऱ्यांना त्याचे गांभीर्य कळू नये, याचे नवल वाटते.

आम्हाला वाटेल तेव्हाच आम्ही काम करू, नाहीतर कुणी कितीही सांगितले तरी हातपाय हलवायचे नाही, अशी मानसिकता असलेले उच्चपदस्थ अधिकारी असतील तर त्याचे प्रतिकूल परिणाम राज्य शासनालाही सहन करावे लागतात. जी बाब राज्य शासनातील अधिकाऱ्यांच्या दृष्टीने दुर्लक्षित करण्यासारखी असेल, पण तिचा थेट सामान्यांशी संबंध येऊन त्याचे परिणाम लोकांना सहन करावे लागत असतील तर हा विषय गांभीर्याने घेतलाच जायला हवा. त्यातही जर सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात हस्तक्षेप करीत काही निर्देश दिले असतील तर त्या विषयाचे गांभीर्य राज्य शासनातील अधिकाऱ्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही. देशातील मोकाट, भटक्या कुत्र्यांकडून लहान मुले, नागरिकांवर केले जात असलेले हल्ले आणि चावा घेण्याच्या



घटनेनंतर न्यायालयाने २२ ऑगस्ट रोजी एक आदेश पारित करीत अशा कुत्र्यांना पकडा, नसबंदी करा आणि टॅग लावून मूळ ठिकाणी सोडून द्या, अशा सूचना दिल्या. सोबतच केलेल्या कारवाईसंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचेही सांगितले. सर्व राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी हे निर्देश होते. पण पश्चिम बंगाल, तेलंगणा आणि दिल्ली महापालिका वगळता कुणीही हे प्रतिज्ञापत्र सादर केले नाही आणि म्हणून न्यायालयाने सरकारची चांगलीच कानउघाडणी केली. हे करताना भंडारा आणि पुणे येथील घडलेल्या घटनेचा उल्लेखही त्यांनी केला. २२ ऑगस्ट नंतर घडलेल्या घटना गंभीर असतानाही प्रतिज्ञापत्र सादर का केले नाही? तुम्ही वर्तमानपत्र वाचता की नाही, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला. आता या सुनावणीसाठी सभागृहात न्यायालय भरवायचे का? असा उद्विग्न प्रश्न न्यायालयाने विचारला. सर्वोच्च न्यायालय मोकाट कुत्र्यांच्या विषयात एवढे गंभीर आहे, याचा अर्थ हा विषय सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा नक्कीच आहे. रोज असंख्य घटना पुढे येत आहेत. लहान मुलांचे जीव अशा घटनांमध्ये जात आहेत. काही दिवसांपूर्वी भंडारा शहरात अवघ्या काही तासात १२ लोकांचे लचके मोकाट कुत्र्याने तोडले होते. सामान्य लोक काहीही दोष नसताना नाहक वेदना सहन करीत आहेत. स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणा थातूरमातूर काम केल्याचे दाखवून उपाययोजना केल्याचा आव आणते. हे चित्र सर्वत्र आहे. मग अशावेळी न्यायालयाने जर हा विषय गांभीर्याने घेतला असेल तर शासनातील अधिकाऱ्यांना त्याचे गांभीर्य का कळू नये? आज मोकाट कुत्र्यांच्या झुंडीमध्ये सापडलेली व्यक्ती स्वतःचा जीव वाचविताना जिवाचा आटापिटा करून कशीबशी बाहेर पडते. अशा कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्याचे काम यंत्रणेकडून होत नसेल तर मात्र न्यायालयाने शासनाचे टोचलेले कान योग्यच आहेत. मोकाट कुत्र्यांचा विषय विदेशातही चर्चेचा झाला आहे. यामुळे देशाची बदनामी होत आहे, असे न्यायालयाला सांगावे लागत असेल आणि तरीही या विषयाला घेऊन आमची यंत्रणा गंभीर नसेल तर शासकीय लालफीतशाही काय असते, हे स्पष्ट होते. कायमच न्यायालय लोकांशी संबंधित अनेक विषयांवर राज्य शासनाचे म्हणजेच प्रशासकीय यंत्रणेचे लक्ष वेधीत असते, पण ज्यांच्या हातात निर्णय घेण्याची क्षमता आहे, त्यांची मानसिकताच अशा विषयांचे गांभीर्य समजण्याची नसेल तर न्यायालयालाही केवळ खरडपट्टी काढण्यासाठी दुसरा काय पर्याय असेल?

९७६३७१३४१७

---

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता- पुरुषोत्तम योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा १५ वा अध्याय पुरुषोत्तम योग म्हणून ओळखला जातो. लौकिक अर्थ घेतला तर पुरुषातला सर्वोत्तम म्हणजे पुरुषोत्तम. हा प्राथमिक अर्थ बरोबरच आहे. नराचा नारायण होण्यासाठी किंवा मानवाचा माधव होण्यासाठी जे जे करावे लागते ते ते करणे, तसा आचार विचार ठेवणे म्हणजे पुरुषोत्तमाकडे वाटचाल होय. अशा अर्थाने पुरुषोत्तम योग घेतला तरीही काहीच हरकत नाही. पण त्यापुढे जाऊन गर्भित अर्थदेखील पाहिला पाहिजे.

१५ व्या अध्यायात पुरुषोत्तम म्हणजे एखादी व्यक्ती किंवा एखादा देह नाही तर पुरुषोत्तम ही परिपूर्ण आनंदाची अवस्था आहे.

'आनंदाचे डोही आनंद तरंग' म्हणजे अथांग, अपार, अनंत, निरतिशय असा आनंदसागर आणि त्या आनंदसागरात आकंठ डुंबणे या अवस्थेला पुरुषोत्तम अवस्था म्हणतात. पुरुषोत्तम म्हणजे परिपूर्ण अवस्था. असे असले, तरी परिपूर्ण फक्त परमेश्वर आहे. पुरुषोत्तम अवस्था म्हणजे त्या पूर्णपूर्णावतार परब्रह्म परमात्म्याशी साम्यरूप होणे. जीवनात पुरुषोत्तम होणे हीच आपली इतिकर्तव्यता असावी. असो. पुरुषोत्तम योग या अध्यायात भगवंतांनी याच पुरुषोत्तम अवस्थेबद्दल चर्चा केली आहे. अध्यायाच्या प्रारंभीच संसार काय आहे? हे सांगण्यासाठी अश्वत्थ वृक्षाचे रूपक देऊन संसाररूपी वृक्ष कसा आहे? हे भगवंतांनी सांगितले आहे.

**श्रीभगवानुवाच - 'ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।**
**छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥'**

अश्वत्थ म्हणजे ज्याची सत्ता उद्या असेलच असे नाही. थोडक्यात अश्वत्थ म्हणजे नाशवंत. भगवंताने सांगितलेला हा संसाररूपी नाशवंत अश्वत्थ वृक्ष उलटा आहे. म्हणजे त्याचे मूळ वर आणि फांद्या खाली आहेत. यावरूनच कळेल की, हा संसारवृक्ष नाशवंत आणि क्षणभंगुर आहे. मूळ वर म्हणजे तो हमखास नाश पावणार आहे हे आपल्या सर्वांना कळते, पण वळत नाही. हा विसर आपल्याला का पडतो? याचे कारणही भगवंतच सांगतात.

**'अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।'**

या संसार वृक्षाच्या शाखांना विषयरूपी अंकुर फुटलेले आहेत. अंकुर म्हणजे नवनवी वाढ. म्हणजे संसारात विषय वासना वाढत्या आहेत. त्या दररोज अंकुरतात आणि संसार वृक्षाला मोठे मोठे करतात. या अश्वत्थ वृक्षाच्या विषयरूपी फांद्या वेळीच छाटल्या पाहिजेत. त्यासाठी विवेक वैराग्याची कुऱ्हाड घ्यावी लागेल आणि फांद्या छाटाव्या लागतील. इथे वैराग्य म्हणजे संसारत्याग नाही तर संसाराचा विवेक आहे.... **'तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥'**

भगवान म्हणतात, त्यासाठी त्या आदिपुरुषाला म्हणजे मला शरण जाणे हाच उपाय आहे. त्याला शरणागत जाण्याचा सोपा मार्ग कोणता?

**'निर्मानमोहा जितसङ्गदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।**
**द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ॥'**

प्रयत्नपूर्वक मोहरहित, आसक्तिरहित होऊन नित्य अध्यात्मचिंतन, नामस्मरण करणे. कामनारहित होऊन सुखदुःखाच्या अकारण चिंतेत गुंतून न राहता सर्व भार त्या भगवंतावर सोडणे. म्हणजे ते परमपद अर्थात पुरुषोत्तम पद मिळेल. हे सर्व अशक्य नाही. त्यासाठी दृढविश्वास पाहिजे.

**'न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः ।**
**यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥'**

या परम अवस्थेला सूर्य, चंद्र किंवा अग्नी प्रकाशमान करीत नाहीत तर ज्याच्यामुळे परत संसारात येणे नाही ते परमधाम म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर प्रकाशमान करतात. भगवंत स्पष्टच सांगतात-

**'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।'**

मृत्युलोकात सर्व जीवात्मे माझेच सनातन अंश आहेत. हा जीवात्माच आपल्या शरीरात राहून मन आणि ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने विषयांचा उपभोग घेतो. हा उपभोग घेताना अज्ञानी लोकांना वाटते की, हे सर्व मला प्राप्त आहे. ज्ञानी मात्र ज्ञानचक्षूने पाहताना हे भगवंताचे समजून कृष्णार्पण भावना ठेवतात.

**'यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।**
**यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥'**

म्हणजे विश्वाला प्रकाश देणारे सूर्य, चंद्र आणि अग्नीदेखील भगवंतामुळे प्रकाशमान आहेत. भगवान पुढे अर्जुनाला सांगतात की,

**'अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।**
**प्राणापानसमायुक्तक्त पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥'**

अन्नामुळे जीव आहेत. हे अन्न जठरातील अग्नीमुळे पचते. तो जठराग्नी कोण आहे? तर, सर्व प्राणिमात्रांच्या देहात स्थित असलेला परमात्माच वैश्वानर अग्नी होऊन प्राण आणि अपानाने भक्ष्य, लेह्य, पेय्य आणि चोष्य असे चारही प्रकारचे अन्न पचवतो. भगवंत अर्जुनाला सांगतात की-

**'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टेमत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।'**

मीच सर्व जिवांच्या हृदयात संनिविष्ट आहे. भगवान महत्त्वाचे सांगतात की,

**'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥'**

या सृष्टीत क्षर आणि अक्षर असे दोन प्रकारचे पुरुष आहेत. आपले जीवमात्रांचे शरीर म्हणजे क्षर पुरुष. जो नाशिवंत आहे. त्याच्या आत जे कूटस्थ म्हणजे अविनाशी तत्त्व आहे, त्याला अक्षर पुरुष म्हणतात. या दोहोंच्या पलीकडे एक उत्तम पुरुष आहे, तो क्षर नाही आणि अक्षरही नाही, त्याला पुरुषोत्तम म्हणजे परमेश्वर म्हणतात. जो तिन्ही लोकांचा पोषक आहे.

**'यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।**
**अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥'**

म्हणजे अर्जुना! मी म्हणजे परमात्मा क्षरपुरुषांच्या अतीत आहे. अक्षर पुरुषापेक्षा उत्तम आहे म्हणून पुरुषोत्तम.

**'इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।**
**एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥'**

अर्जुना, पुरुषोत्तम म्हणजे काय? त्यासाठी काय करावे? हे गुह्य शास्त्र मी तुला सांगितले आहे.

एक सांगू! आपण आपला विचार केला तर हा मानव देह भगवंताच्या कृपेने प्राप्त झाला. या देहावर त्याचीच सत्ता आहे. आपण आपल्या कर्माने उत्तम बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मोक्षप्राप्तीसाठी धर्माने वागले पाहिजे. आपल्या जीवनात येणारा पैसा इष्ट मार्गाचा असावा, आपली ऐहिक सुखे कष्टाच्या कमाईतून यावीत. कर्ता करविता परमेश्वर ही दृढ श्रद्धा ठेवून आचरण असावे. आपण उत्तम पुरुष बनलो की पुरुषोत्तम नक्कीच होऊ. या अध्यायाला शास्त्राध्याय म्हणतात.

'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या' हे शास्त्र वचन हा अध्याय सांगतो. हाच पूर्णपुरुष सिद्धांत म्हणून हा पुरुषोत्तम योग आहे. जीवनात माणूस बनून जगा हा जगण्या वागण्याचा उत्तम आणि परिपूर्ण मार्ग असून याशिवाय दुसरा कोणताच मार्ग सोपान नाही म्हणूनच हा पूर्ण अध्याय म्हणूनही जाणला जातो.

९८२२२६२७३५

---

## आजचे संघगीत-२६

बुधवार, २९ ऑक्टोबर २०२५

### चरैवेति चरैवेति यही तो मन्त्र है अपना

चरैवेति चरैवेति यही तो मन्त्र है अपना
नहीं रुकना नहीं थकना सतत् चलना सतत् चलना
यही तो मन्त्र है अपना शुभंकर मन्त्र है अपना...

हमारी प्रेरणा भास्कर है जिनका रथ सतत् चलता
युगों से कार्यरत है जो सनातन है प्रबल उर्जा गति
मेरा धरम है जो भ्रमण करना भ्रमण करना
यही तो मन्त्र है अपना शुभंकर मन्त्र है अपना...

हमारी प्रेरणा माधव हैं जिनके मार्ग पर चलना
सभी हिन्दू सहोदर है ये जन जन को सभी कहना
स्मरण उनका करेंगे और समय दे अधिक जीवन का
यही तो मन्त्र है अपना शुभंकर मन्त्र है अपना...

हमारी प्रेरणा भारत है भूमि की करें पूजा सुजला
सुफला सदा स्नेहा यही तो रूप है उसका जियें
माता के कारण हम करें जीवन सफल अपना
यही तो मन्त्र है अपना शुभंकर मन्त्र है अपना...

---

## वाचक पत्रे

### शिक्षणास प्राधान्य का नाही?

देशात आणि राज्यात विविध विकासकामांवर कोट्यवधी रुपयांच्या योजना आहेत त्यामानाने शिक्षणावरील आर्थिक तरतूद समाधानकारक नाही हे अनेकदा शिक्षणतज्ज्ञ यांनी लक्षात आणून दिले आहे. नुकत्याच प्रसारित काही बातम्या व अहवालवरून शिक्षण क्षेत्रात आलबेल असल्याचे स्पष्ट होते आणि याचा फटका विशेषकरून ग्रामीण भागात बसतोय. या शैक्षणिक सत्रात पहिली ते आठवीच्या जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना पुस्तके मिळणे अपेक्षित होते परंतु जवळपास वीस टक्के विद्यार्थ्यांना चार -पाच महिन्यानंतर सुद्धा पुस्तके मिळाली नाहीत. जिल्हा परिषद शाळांची परिस्थिती आधीच खस्ताहाल आहे आणि यात भर म्हणून शिक्षण विभाग अक्षम्य दुर्लक्ष करून त्यांच्या जीवनाशी खेळ करतोय. याआधी सुद्धा निकृष्ट युनिफॉर्म वाटपावरून वादळ उठले होते. देशात शून्य किंवा एक विद्यार्थी शाळांची संख्या सातत्याने वाढते आहे. जबाबदार विभागास जाब विचारायला नको?

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या युडायस अहवालातून पुन्हा एक चिंता वाढवणारी माहिती बाहेर येते आहे. शैक्षणिक सत्र २०२४-२५ दरम्यान राज्यातील नववी आणि दहावीच्या जवळपास बारा टक्के विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडले आणि मुख्य शिक्षण प्रवाहातून दूर झालेत. शिक्षण हक्क कायदा, समग्र शिक्षा अभियान, पीएम पोषणसारख्या योजना असताना माध्यमिक शिक्षणातील गळती फार चिंताजनक आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले जाते मात्र नववी, दहावीत हेच विद्यार्थी नापास होतात आणि अनेक विद्यार्थी स्वतःहून शिक्षण सोडतात. ही बाब शासनाच्या शैक्षणिक धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते.

राज्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रात सुद्धा काही वेगळी परिस्थिती नाही. आपण सध्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अवलंबिले आहे. असे करताना सारासार विचार केलेला दिसत नाही. या धोरणास पूरक निधी, पायाभूत सुविधा, संसाधने, सोयीसवलती, कर्मचारी संख्या आहे की नाही याची चाचपणी का केली गेली नाही? एका माहिती अधिकारातून राज्यात बारा हजार आणि नागपूर विभागात जवळपास चौदाशे प्राध्यापक, ग्रंथपाल पदे रिक्त आहेत. साडेचारशे महाविद्यालयांचा कारभार प्रभारी प्राचार्य चालवतात. एकूणच काय तर शैक्षणिक क्षेत्रात अस्थिरता आणि शासकीय अनास्था असल्याचे चित्र आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी प्राधान्यक्रमाणे यावर स्थायी उपाय करणे आवश्यक आहे.

**प्रा. विलास डोईफोडे**/९७६६२२९१९९

### ऑनलाईन शॉपिंग जपून करा

दसरा ते दिवाळी या काळात अनेकांनी ऑनलाईन वस्तू खरेदी केल्या असतील. आपल्या देशात ई-कॉमर्सच्या क्षेत्रात अक्षरशः क्रांती झालेली आहे. कुठलीही वस्तू खरेदी करायला स्वतःच्या वाहनाने गेल्यास वाहतूककोंडी आणि पार्किंगची समस्या असते. दुकानातील गर्दी आणि बिलिंगच्या ठिकाणी असणारी लांब रांग खरेदीच्या आनंदात विरजण टाकत असतात. याला पर्याय म्हणून अनेकांनी ऑनलाईन शॉपिंगला पसंती दिलेली आहे. अनेक वस्तूंच्या ऑनलाईन खरेदीवर सणासुदीच्या काळात सवलतींचा वर्षाव केला जातो. तुम्हाला खरेदी करावयाच्या वस्तूबाबत इतर ग्राहकांचे मत आपल्याला मार्गदर्शक ठरू शकते. वेगवेगळ्या ऑनलाईन स्टोअर्सवर हव्या असलेल्या वस्तूंच्या किमतीची तुलना करून योग्य ठिकाणी आपण ऑर्डर नोंदवू शकतो. ऑनलाईन वस्तू खरेदी करताना केवळ वस्तूचे चित्र पाहून आणि वर्णन वाचून आपल्याला निर्णय घ्यावा लागतो. काहीवेळा वस्तू परत करण्याचा पर्याय नसतो. वस्तू पाठवण्यासाठी वापरलेल्या खर्ड्याच्या खोक्यांची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावावी लागते. आपला स्क्रीनटाईम वाढतो आणि ऑनलाईन खरेदीचे व्यसन लागण्याची शक्यता असते. ऑनलाईन खरेदी करताना या सर्व मुद्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नर्सी फाटा ते सावरखेडा चौपदरीकरणासाठी २५१ कोटी मंजूर

## भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्याला यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ आक्टोबर**

हिंगोली शहरातील अत्यंत महत्वाचा नर्सी फाटा-कयाधू नदीवरील पूल-अग्रसेन चौक-जिल्हाधिकारी कार्यालय-खटकाळी रिंगरोड ते राष्ट्रीय महामार्गा १६१ सावरखेडापर्यंतरस्त्याच्याचौपदरीकरणासाठी तसेच रेल्वे उड्डाणपूलासाठी केंद्रीय परिवलन मंत्री नितीन गडकरी यांनी २५१ कोटी रूपयांचा निधी मंजुर केला असून मागील अनेक दिवसांपासून या रस्त्याच्या कामांसाठी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून या रस्त्यामुळे शहरातील वाहतुकीची कोंडी सुटणार आहे.

भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिल्लीत केंद्रीय परिवलन मंत्री नितीन गडकरी यांची नुकतीच भेट घेतली. यासंदर्भात आ. मुटकुळे यांनी हिंगोली शहरात येणारा नर्सी फाटा ते अग्रसेन चौक व राष्ट्रीय महामार्ग १६१ सावरखेडा ते अग्रसेन चौक हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग आहे. परंतु सध्या या रस्त्याची रूंदी कमी असल्यामुळे व या रस्त्यावर असलेला कयाधू नदीवरील पूल व रेल्वे ओव्हर ब्रीज हे दोन्ही पूल अरूंद असल्यामुळे वाहतुकीची नेहमीच प्रचंड कोंडी होत आहे. तासन्तास वाहनांना ताटकळत रहावे लागते. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाच्या अखत्यारीत येतो. त्यामुळे या रस्त्याचा चौपदरीकरणासाठी निधी देण्याची मागणी केंद्रीय भूपृष्ट वाहतुक तथा राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचेकडे केली होती.

आ. मुटकुळे यांच्या मागणीची दखल घेत केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सिमेंट कॉंक्रीट रस्ता चौपदरीकरण व दोन्ही पूलांचे कामे मंजूर करीत २५१ कोटी रूपयंचा निधी मंजुर केला आहे. या रस्त्यामुळे हिंगोली शहरातील महत्वाच्या रस्त्यावरील वाहतुक कोंडींचा प्रश्न मार्गी लागणार आहे. ही कामे मंजुर झाल्यामुळे तसेच निधी मंजूर झाल्यामुळे आ. मुटकुळे यांनी हिंगोलीकरांचे तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहे.

**कयाधू नदी पूल आणि खटकाळी रेल्वे उड्डाण पूलावर नेहमीच वाहतुक कोंडी**

नर्सी फाट्याकडून येणाऱ्या वाहन चालकांना अनेकवेळा कयाधू नदीवरील पूलावर अचानक वाहतुक कोंडी झाल्यामुळे तासन्तास वाहतुकीच्या कोंडीचा सामना करावा लागत आहे. हा पुल अत्यंत जुना आणि तकलादू झाला आहे. तसेच खटकाळी रेल्वे उड्डाणपूलाचे काम दोन ते तीन वर्षापूर्वीच झाले परंतु हा पूल अत्यंत अरूंद झाल्यामुळे आणि शहरात येणारी आणि शहरातून जाणारी सर्व वाहतुक याच पुलावरून जात असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत आहे. तसेच या पूलाचे कामही निकृष्ट दर्जाचे झाल्याचे नागरिक सांगत आहेत.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी डिबीटीद्वारे १५१ कोटी ७८ लाख अनुदान जमा

## प्रलंबीत शेतकऱ्यांनी ई केवायसी, ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ आक्टोबर**

जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्याचे काम वेगाने सुरु करण्यात आले असून आतापर्यंत अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी डिबीटीव्दारे १८१ कोटी ५० लाख ७ हजार ७९१ रुपये निधी वितरित करण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर भरुन मान्यता देण्यात आली आहे. तर १ लाख ९७ हजार ९८ शेतकऱ्यांच्या खात्यावर १५१ कोटी ७८ लाख ८२ हजार ६१७ रुपये मदतीचे अनुदान डीबीटीद्वारे जमा करण्यात आली आहे. ई-केवायसी अभावी प्रलंबित शेतकरी लाभार्थ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी व ई-केवायसी करुन अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

जिल्ह्यात जून ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी शासनाने हिंगोली जिल्ह्यासाठी २३१ कोटी २७ लाख ९२ हजार ३३५ रुपयांची मदत मंजूर केली आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यात थेट निधी वितरीत करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व संबंधित तहसीलदारांनी २ लाख ३७ हजार ८७३ शेतकऱ्यांना १८१ कोटी ५० लाख ७ हजार ७९१ रुपयांच्या निधी वितरित करण्यासाठीची माहिती संगणक प्रणालीवर भरुन डीबीटीद्वारे निधी वितरीत करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. यापैकी १ लाख ९७ हजार ९८ शेतकऱ्यांच्या खात्यावर १५१ कोटी ७८ लाख ८२ हजार ६१७ रुपयाची मदत डीबीटीद्वारे वितरीत करण्यात आली आहे. ई-केवायसी प्रलंबित असलेल्या ४९ हजार ८५५ शेतकऱ्यांना ३५ कोटी २७ लाख ८ हजार ६१५ रुपयाची मदत ई-केवायसी व ॲग्रीस्टॅक नोंदणी केल्यानंतर लगेच वितरीत करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यातील ३४ हजार ४६२ शेतकऱ्यांना २८ कोटी ७ लाख ७७ हजार ५४९, वसमत तालुक्यातील ४८ हजार २६० शेतकऱ्यांना ३१ कोटी ०३ लाख ६ हजार ९ रुपये, हिंगोली तालुक्यातील ३४ हजार ९५९ शेतकऱ्यांना २७ कोटी ६३ लाख ३ हजार ९७३ रुपये, कळमनुरी तालुक्यातील ३८ हजार ६७ शेतकऱ्यांना ३३ कोटी १० लाख ३८ हजार ५५८ आणि सेनगाव तालुक्यातील ४१ हजार ३५० शेतकऱ्यांना ३१ कोटी ९४ लाख ५६ हजार ५२७ रुपयाची मदत त्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. प्रलंबित राहिलेले ३५ कोटी २७ लाख ८ हजार ६१५ रुपयाचे अनुदान जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्य शासनाने शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक नोंदणी बंधनकारक केली आहे. ज्या शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी केली आहे. त्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा होत आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी नसणाऱ्या शेतकऱ्यांना ई-केवायसी करावी लागत आहे. त्यामुळे सर्व संबंधित शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करुन घेऊन अनुदानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी मागणीचे प्रस्ताव सादर करा- गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ आक्टोबर**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, प्रदीप नळगीरकर, समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गिता गुठ्ठे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांच्यासह सर्व विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत विविध विकास योजनांचे निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव आयपासवर अपलोड करुन तात्काळ सादर करावेत. क्रीडांगण विकास कामासाठी आदर्श शाळाचा समावेश करावा. सरंक्षण भिंतीची आवश्यकता असलेल्या शाळेची यादी द्यावी. तसेच नाविण्यपूर्ण कामाचा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

यावेळी मृद व जलसंधारण, दुग्धशाळा विकास, महावितरण, पोलीस, जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभाग, मत्स्यव्यवसाय, क्रीडा विभाग, कौशल्य विकास योजना, पाणीपुरवठा व स्वच्छता, कृषि विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण, महिला व बालविकास विभाग, वन विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास, पाटबंधारे, शिक्षण, परिवहन विभाग यासह विविध विभागांच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रशासनाच्या विविध विभागांना त्यांच्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करुन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. तसेच जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनाचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

पीएम अवार्ड व राष्ट्रीय ई-गव्हर्नस अवार्डसाठी सर्व संबंधित विभागाने दिलेल्या निर्देशांकाची माहिती वेळेत अपलोड करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिल्या.



**हिंगोली- येथील पोलिस विभागातील आर्थिक गुन्हे शाखेचे कर्मचारी विठ्ठल काळे यांचा मुलगा वैभव काळे यांची ॲमेझॉन कंपनीत ५१ लाख रूपयांचे पॅकेजवर सॉफ्टवेअर इंजिनिअर या पदावर नियुक्ती झाली. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी वैभव आणि त्याच्या आईवडीलांचा सत्कार करीत त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### संकलन केलेला निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे सूपूर्द

हिंगोली- येथील संतश्रेष्ठ नामदेव महाराज पठाडे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी हिंगोली शहरांमध्ये प्रत्येकात मदत संकलन फेरी काढून संकलित केलेला निधी एकूण २०११३ रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रभाकर क-हाळे यांनी सुपूर्त केला. त्यावेळी एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. सुभाष चव्हाण व श्री अशोक लोंढे सोबत होते.

### आश्रम शाळेतील शिक्षकभरतीसाठी अर्ज करा

हिंगोली- कळमनुरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या हिंगोली व परभणी जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेमधील शिक्षकांची रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी बाह्यस्त्रोत संस्था मे छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व मे. महाराष्ट्र विकास ग्रुप यांना आदेश देण्यात आलेले आहेत. कळमनुरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत ५ आश्रमशाळा येत असून त्यापैकी ०१ आश्रमशाळा ही उच्च माध्यमिक आहे. या शाळेमध्ये उच्च माध्यमिक शिक्षक हे रिक्त पद बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येणार आहे. यासाठी एमएससी (रसायनशास्त्र) बीएड टीएआयटी स्कोअर असणे आवश्यक आहे. इच्छूक व पात्र उमेदवारांनी अपर आयुक्त नाशिक व ठाणे विभागाच्या अपर आयुक्त अमरावती व नागपूर विभागाच्या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकवर दि. ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत अर्ज भरण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन कळमनुरी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी केले आहे.

### वाचनालयात दिवाळी अंकांची प्रदर्शनी

हिंगोली- येथील के रंभाबाई रामचंद्र बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालय हिंगोलीच्या वतीने दिवाळी अंक ही अभिनव योजना काही दशकापासून सातत्याने राबवली आहे. या ही वर्षी ग्रंथालयात दिवाळी अंकाचे खास भव्य प्रदर्शन आयोजित केले आहे या प्रदर्शनी उद्घाटन आशिष ढोक जिल्हा ग्रंथालय अधिकारी हिंगोली यांच्या हस्ते करण्यात आले प्रमुख पाहुणे म्हणून खंडेराव सरनाईक अध्यक्ष मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ छत्रपती संभाजी तसेच ग्रंथालय निरीक्षक मिलिंद सोनकांबळे प्रा. जी पी मुपकलवार हे होते. ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापूर यांनी गेल्या पंधरा वर्षापासून या अभिनव चळवळ व ग्रंथालयाची वाटचाल या संदर्भात प्रस्तावित केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सदस्य आर एस दुबे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ग्रंथपाल संतोष ससे यांनी केले तर आभार प्रदर्शन रामेश्वर गांजे यांनी मानले या कार्यक्रमासाठी अभ्यासिक कक्षेतील विद्यार्थी तसेच वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवींद्र डोंगरे दयानंद पुरी लक्ष्मण लाड यांनी पुढाकार घेतला.

### ४५ ठिकाणी अवैध दारू विक्रीवर छापे

हिंगोली- हिंगोली पोलिस विभागाच्यावतीने दारूबंदी कायद्यांतर्गत विशेष मोहीम राबवीत ४५ ठिकाणी छापे मारण्यात आले. यावेळी ५३ हजार २९० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# अधिकाऱ्यांच्या गाड्या फोडण्याऐवजी सत्ताधाऱ्यांच्या फोडा- सुजात आंबेडकर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ आक्टोबर**

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी पंजाबमध्ये भरीव मदत देण्यात आली मात्र महाराष्ट्रात तुटपूंजी मदत मिळत असून शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या गाड्या फोडण्याऐवजी सत्ताधाऱ्यांच्या गाड्या फोडल्यास अतिवृष्टीचे पैसे मंजुर होतील असे आवाहन वंचीतचे बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी हिंगोलीतील जाहीर सभेत केले.

हिंगोलीमध्ये वंचीत बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांची मंगळवारी संध्याकाळी जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, पंजाबमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तेथील सरकारने भरीव मदत केली. त्या तुलनेत महाराष्ट्रात केवळ ८५०० रूपयांची मदत करण्यात आली आहे. सदर तुटपूंजी मदत शेतकऱ्यांच्या माथी मारली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड करून संताप व्यक्त केला जात आहे. मात्र अधिकारी हे सत्ताधाऱ्यांच्या आदेशानुसार काम करतात. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या गाड्या फोडण्याऐवजी सत्ताधाऱ्यांच्या गाड्या फोडल्या तरच आपल्याला वाढीव मदत मंजुर होईल.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर पालिका निवडणुकीत वंचीतचा झेंडा फडकाविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जनतेची प्रश्न समजून घेत त्याची सोडवणुक केली पाहीजे. कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकांसाठी कामाला लागण्याचे आदेश दिले. वंचीत बहुजन आघाडीची सत्ता आल्यास तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल असे आश्वासनही यावेळी त्यांनी दिले.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त एसीबीच्यावतीने कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ आक्टोबर**

येथील लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत दि. २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.



या सप्ताहामध्ये जिल्ह्यात तालुकानिहाय विविध शहर व ग्रामीण भागात प्रत्यक्षपणे नागरिकापर्यंत जाऊन भ्रष्टाचार निर्मूलन संबंधाने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच विविध स्पर्धा कार्यक्रम, चर्चासत्रे, वादविवाद स्पर्धा, व्याख्याने, निबंध स्पर्धा, कार्यशाळा आदींचे आयोजन करण्यात येणार आहे. या सप्ताहादरम्यान भ्रष्टाचार संबंधी काही तक्रार असल्यास, तक्रार कशी करावी याबाबतची माहिती जिल्हयातील विविध शहरी व ग्रामीण भागातील लोकापर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे घोषवाक्य असलेली भ्रष्टाचार निर्मूलनाची पत्रके, पॉम्पलेट, भितीपत्रके, बॅनर तयार करण्यात आले असून या माध्यमातून दि. २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत आयोजित दक्षता जनजागृती सप्ताहात कार्यालयाने तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार प्रत्येक दिवशी नागरिकांपर्यंत पोहोचून भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करण्यात येत आहे. शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचे व अटींचे काटेकोर पालन करुन दक्षता जनजागृती सप्ताह राबविण्यात येत आहे.

# डॉ संपदा मुंढे आत्महत्याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ आक्टोबर**

येथे फलटण (जिल्हा सातारा) येथील उपजिल्हा रुणालयातील महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. संपदा मुंडे यांच्या संशयास्पद आत्महत्येप्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा कथित सहभाग तसेच गंभीर प्रशासकीय त्रुटींच्या पार्श्वभूमीवर तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख डॉ. रेणुका पतंगे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. डॉ. पतंगे यांनी या प्रकरणात निष्पक्ष तपास होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी केली.त्या म्हणाल्या की, महिलांवर अन्याय करणाऱ्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले पाहिजे. प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आणि दबावामुळे एका संवेदनशील महिला डॉक्टरला आत्महत्या करावी लागली, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय सावंत (गोपू पाटील), शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, उपजिल्हाप्रमुख गणेशराव शिंदे, शहरप्रमुख रवीस्वामी पुपालू , शहरसंघटक चंद्रशेखर उबाळे, जिल्हाप्रवक्ता विठ्ठल चौतमाल, उपजिल्हा संघटक शंकर घुगे, सर्कलप्रमुख शिवाजी कऱ्हाळे, माधवीताई जोशी तालुका प्रमुख, संगीता ताई स्वामी शहरप्रमुख, मीरा ताई दातार व इतर पदाधिकारी महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची राष्ट्रवादीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ आक्टोबर**

हंगाम २०२५- २६शासकीय हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा या यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार )पक्षाच्यावतीने औंढा तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे. सदरील निवेदन महसूल नायब तहसीलदार प्रवीण ऋषी यांनी स्वीकारले.

निवेदनात नमूद, शासनाने ठरून दिलेल्या महाराष्ट्र राज्य पणन महासंघ यांच्या मार्फत २०२५-२६ मध्ये हमीभावा प्रमाणे खरेदी आतापर्यंत ही सुरू केलीली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर खूप मोठी अडचन निर्माण झालेली आहे. शेतकरी कडे पुढील पेरणी साठी खूप मोठी अडचन निर्माण होत आहे व शेतकरी बाजारा मध्ये सोयाबीन विक्री साठी घेऊन जातो .तेंव्हा बाजारा मध्ये सोयाबीनला ३ हजार ८०० रुपये ते ४ हजार दोनशे रुपये पर्यन्त भाव मिळत आहे. आणि एकिकडे शासनाने हमिभाव ५ हजार ३२८ रुपये भाव ठवून दिलेला असतांना खरेदी मात्र अद्याप ही सुरू केलेली नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. शासनाने लवकरात लवकर खरेदी सुरू करावी.नाहीतर शेतकऱ्यांना घेऊन तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल . असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. हे निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतीने औंढा तहसील मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आले आहे.

या निवेदनावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष शेख फरीद उर्फ मुनीर पटेल,रमेशराव सानप तालुकाध्यक्ष,संभाजी चव्हाण तालुका उपाध्यक्ष, आप्पाराव आहेर, राजकुमार सुरूसे, गुरु स्वामी मठपती, खादीर रहीम पटेल, गंगाधर नारायण लंगोटे, शिवाजी उमाजी गाढवे, विकास पांडववीर, बाळू पांडववीर, गणेश बालाजी मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### वीस वर्षानंतर जवाहर विद्यालयाच्या २००गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर येथील जवाहर विद्यालयाच्या २००५च्या दहावीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा शनिवार २५ ऑक्टोंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तब्बल वीस वर्षांनंतर सर्व मित्र पुन्हा एकत्र आल्याने सर्व वर्गमित्र आनंदीत झाले.

कार्यक्रमाची सुरुवात शहरातील प्रताप हॉटेलमध्ये नाश्त्याने झाली. गरमागरम खिचडी आणि भज्यांच्या स्वादिष्ट मेजवानीत जुन्या आठवणी जाग्या झाल्या. त्यानंतर सर्वजण शाळेत पोहोचले आणि अगदी शिस्तीत प्रार्थना म्हणत शालेय दिवसांच्या आठवणीत हरवले. प्रत्येकाचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. दिवसभर हशा, खेळ, गाणी, आणि स्पर्धांचा उत्साह रंगला. जुनी टीम विरुद्ध नव्या जोशाची टीम या दोन संघांमध्ये खेळवण्यात आलेल्या मैत्रीपूर्ण क्रिकेट सामन्याने जुन्या आठवणींना नवा उजाळा दिला. मैदानावर टाळ्यांचा गजर आणि जयघोषात मैत्रीचा उत्सव साजरा झाला. दुपारी नागराज हॉटेलमध्ये सर्वांनी रुचकर जेवणाचा आस्वाद घेतला. हास्यविनोद, आठवणी आणि गप्पांनी वातावरण रंगले. समारोप चहापान सोहळ्यात सर्वांनी पुन्हा लवकर भेटूया अशी भावनिक प्रतिज्ञा घेतली.

या स्नेहमिलन सोहळ्यास महेश कुलकर्णी, सतीश ईप्पर, नागेश जोशी, शिरीष चक्कवार, अश्विन कारंजकर, राजेश वटाणे, प्रदीप राठोड, सय्यद जुनेद, विकास वाव्हळ, गणेश महाजन, गणेश कदम, कृष्णा लोखंडे, मन्मथ टाले, निजाम काझी, विवेक मुक्कावार, श्रीरंग खांडेकर, जगदीश लाहोरे, गजानन आकोशे, रवी राऊत, श्रीकांत चव्हाण, संतोष हळदे, गणेश पोटेकर, सचिन गायकवाड आदी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिंतूर व बाहेरगावावरून दिवाळीनिमित्त आलेल्या सर्व मित्रांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. वीस वर्षांनंतर झालेली ही भेट सर्वांच्या मनात कायमस्वरूपी आठवण बनून राहिली.

### शिवसेनेव्दारे संघटन मजबूत करण्यावर भर

**परभणी,/प्रतिनिधी :** शिवसेना लोकसभा मध्यवर्ती कार्यालयात आज मंगळवार २८ ऑक्टोंबर रोजी शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन नवीन पदवाटप करण्यात आले. बैठकीत संघटनात्मक बांधणी, पक्षविस्तार आणि जनसंपर्क अभियानाबाबत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीस शिवसेना संपर्कप्रमुख माजी खासदार सुरेशराव जाधव, माजी जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे, युवा सेना जिल्हाप्रमुख आप्पाराव वावरे, माजी महानगरप्रमुख नितेश भैया देशमुख, नगरसेवक धम्मदीप रोडे, महिला जिल्हा संघटक चव्हाण, महाराष्ट्र राज्य व्ही.जी.एन.टी. उपाध्यक्षा चिंचाणे, तसेच शिवसेना विधानसभा प्रमुख ॲड. बोरीकर यांच्यासह अन्य महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. बैठकीत संघटन मजबूत करण्यावर आणि कार्यकर्त्यांपर्यंत पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचवण्यावर भर देण्यात आला.

### आद्या बाहेतीला राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत दुहेरी मुकूट

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनतर्फे पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात २५ ते २७ ऑक्टोबर दरम्यान झालेल्या ३४व्या राज्य अजिंक्यपद आणि ८७व्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत परभणीच्या अद्या बाहेती हिने दुहेरी मुकुट पटकावत परभणीचा झेंडा राज्यस्तरावर फडकावला.

अद्या बाहेती ही जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. तिने या स्पर्धेत अकरा वर्षे मुलींच्या गटात मुंबईच्या स्वरा गुडे हिला ३-० अशा सरळ सेटमध्ये पराभूत करत राज्य अजिंक्यपद पटकावले. तर पंधरा वर्षे मुलींच्या गटात पुण्याच्या नायशा रेवास्कर हिला ३-० अशा विजयाने नमवून दुसरे राज्य अजिंक्यपद मिळवले.

या यशासोबत अद्याने पंधरा वर्षे मुलींच्या सांघिक गटाचे नेतृत्व करत परभणी जिल्ह्यास कांस्यपदक मिळवून दिले. या संघात शरयू टेकाळे, कल्याणी सवंडकर आणि स्वरनिका पाटील या खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे अद्याने या स्पर्धेत दोन सुवर्ण आणि एक कांस्य असे तीन पदक आपल्या नावे केले.

अद्याच्या या उज्वल कामगिरीबद्दल राज्य अध्यक्ष प्रवीण लुकंड, राज्य सरचिटणीस यतिन टिपणीस, राज्य कोषाध्यक्ष संजय कडू, जिल्हा अध्यक्ष समशेर भैया वरपुडकर, कार्याध्यक्ष माधव शेजुळ, सचिव गणेश माळवे, सहसचिव ज्ञानेश्वर पंडित, जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंडे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर, रोहन औंढेकर, तालुका क्रीडा अधिकारी कल्याण पोळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### वस्सा येथील ११ वर्षीय विद्यार्थ्यांचा डेंग्यूने मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील वस्सा येथील महात्मा फुले विद्यालयात शिकणाऱ्या ११ वर्षीय विद्यार्थ्याचा डेंग्यू सदृश्य तापाने उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी (दि. २६) सायंकाळी घडली. मयत फरहान शेख रेहान (वय ११) हा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी असून, दोन दिवसांपूर्वी अचानक ताप आल्याने त्याला नांदेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती सुधारत नसल्याने पुढील उपचारासाठी त्याला छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे रविवारी सायंकाळी त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. डेंग्यू सदृश्य तापाने मृत्यू झाल्याने आरोग्य विभागाने वस्सा परिसरात सर्वेक्षण करून डेंग्यूचा प्रादुर्भाव आहे का, याची तातडीने तपासणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# काँग्रेसच्या परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दुर्राणी

## जिल्हाध्यक्षपदावरील तिढ्याला अखेर पूर्णविराम; आगामी निवडणुका लक्षात घेत पक्षश्रेष्ठींचा निर्णय

**मोहन धारासूरकर**
**परभणी/प्रतिनिधी-** परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार वरिष्ठ उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी दुर्राणी यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेऊन ही नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेला जिल्हाध्यक्षपदाचा तिढा अखेर संपुष्टात आला आहे.

माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांनी काही महिन्यांपूर्वी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केल्याने जिल्हा काँग्रेसला मोठा धक्का बसला होता. या पार्श्वभूमीवर पक्षात नवसंजीवनी आणण्यासाठी नवीन नेतृत्वाची आवश्यकता भासत होती. काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपदही रिक्त झाले होते. या जिल्हाध्यक्षपदाकरीता काँग्रेसमधील अनेक नेत्यांनी दावेदारी केली होती. त्यामध्ये माजी खासदार तुकाराम रेंगे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, युवक नेते रविराज देशमुख, महानगर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार यांचा समावेश होता. स्थानिक काँग्रेस नेत्यांनी प्रदेशाध्यक्षांकडे निष्ठावान कार्यकर्त्यांनाच जिल्हाध्यक्षपद देण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते अतूल लोंढे यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांशी संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. मात्र, या भेटींपश्चातही पक्षश्रेष्ठींनी बराच काळ मौन बाळगल्याने जिल्ह्यात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

या काळातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी मुंबईतील



प्रदेश कार्यालयात पक्ष श्रेष्ठींच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यानंतर लगेचच त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली जाईल, अशी ही चर्चा होत होती. परंतु, पक्षातल्या एका गटाने या संभाव्य नियुक्तीत अडसर निर्माण केला. जिल्हाध्यक्षपदासाठी माजी खासदार ॲड. तुकाराम रेंगे पाटील आणि नव्याने काँग्रेसमध्ये दाखल झालेले माजी आमदार दुर्राणी या दोघांमध्ये जोरदार चुरस सुरू होती. या दोघांनीही आपापले गटबळ दाखवून पक्षश्रेष्ठींवर दबाव आणला होता. अखेर पक्षाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून प्रभारी जिल्हाध्यक्षपदी बाबाजानी दुर्राणी यांची नियुक्ती केली आहे. पक्षश्रेष्ठींनी घेतलेल्या या निर्णयाकडे आगामी निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

दरम्यान, या नियुक्तीबाबत काही वरिष्ठ नेत्यांमध्ये नाराजीही व्यक्त होत आहे. नुकतेच पक्षात दाखल झालेल्या नेत्याला जिल्हा नेतृत्व देणे हे स्थानिक कार्यकर्त्यांसाठी धक्कादायक ठरेल, अशी प्रतिक्रिया काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी दिली. तर दुसरीकडे, दुर्राणी यांच्या समर्थकांनी मात्र या निर्णयाचे स्वागत करत त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला नवी उभारी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.



### मा आमदार बोर्डीकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत दरगड यांची मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत

**जिंतूर,/प्रतिनिधी-** माजी आ रामप्रसाद जी कदम बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड यांनी त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मा. बोर्डीकर साहेबाच्या ७३ वाढदिवसाचे औचित्य साधून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ७३ हजार रु धनादेश दिला या बद्दल पालकमंत्री *ना.मेघना बोर्डीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधरराव बोर्डीकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की माजी आ. बोर्डीकर साहेब यांचा २४ ऑक्टोबर रोजी ७३ वा वाढदिवस असून दरवर्षी माजी आमदारांचा वाढदिवस आनंदात साजरा केला जातो.परंतु या वर्षी राज्यात अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक नष्ट झाले असून महापुरा मुळे अनेक गावात,वसाहती, वाडी,वस्ती,तांडे मध्ये पाणी शिरून घरातील संसार उपयोगी वस्तू,अन्नधान्य,
कपडे सर्व काही वाहून गेले.अनेक ठिकाणी जनावरे,माणसे वाहून गेल्याने जीवितहानी सुद्धा झाली त्यामुळे या वर्षी २४ ऑक्टोबर रोजी वाढदिवसानिमित्त नागरिक,कार्यकर्ते पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी,फुलांचे हार,भेटवस्तू न आणता किंवा शुभेच्छा बॅनर न लावता त्या पैशातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत करावी असे आवाहन माजी आ बोर्डीकर यांनी केले होते.त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड यांनी ७३००० रु धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिला या वेळी भाजपा तालुका अध्यक्ष गोविंद थिटे पाटील,प्रभाकर वाघिकर,नागेश तडकसे,सुनील भोंबे आदी मान्यवर उपस्थित होते



**जिंतूर- रामप्रसाद बोर्डीकर यांच्या संवेदनशील व समाजाभिमुख स्वभावाचा आदर्श घेत, त्यांच्या आवाहनाला कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. साहेबांच्या प्रेरणेतून सुनील भोंबे पाटील आणि अभिजीत पारवे यांनी कोणताही बॅनर किंवा फलक न लावता, अतिवृष्टीग्रस्त शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये तब्बल ५१,००० रुपये प्रत्येकी धनादेश मा आ रामप्रसादजी बोर्डीकर साहेब यांच्या कडे प्रदान केला आहे.**

### जिंतूर सर्वे क्रं.९४ मधील प्लॉट विक्रीवर स्थगिती लावा- सामाजिक कार्यकर्त्याचीमागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मौजे जिंतूर येथील सर्वे क्र. ९४ मधील ०० हे. ६१ आर क्षेत्रातील मंजूर लेआऊटमधील प्लॉट क्रमांक ०१ ते १८ यांची विक्री, नमुना क्र. ४३ नोंद तसेच नामांतर प्रक्रिया न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निकाल लागूपर्यंत तात्पुरती स्थगित ठेवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे (रा. साईनगर तांडा, जिंतूर) यांनी आज (दि. २७ ऑक्टोबर) नगर परिषद जिंतूरचे मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.
अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, या भूखंडाचे मालक श्री. सुरेंद्र गेंदमलजी बाठिया यांनी तत्कालीन मुख्याधिकारी श्री. प्रदीप जगताप यांच्या संगनमताने ओपन स्पेस, रस्ता व नाले यांसारख्या मूलभूत सुविधा न देता लेआऊट मंजूर करून सर्व प्लॉट विक्रीस काढले. या प्रकरणी जिल्हा प्रशासनाने चौकशी सुरू केली असताना, संबंधितांनी हे प्रकरण न्यायालयात नेऊन शासन अधिकाऱ्यांकडून हस्तक्षेप न करण्यासाठी मनाई आदेश मागवले आहेत.
या प्रकरणासंदर्भात मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परभणी यांची नोटीस क्रमांक ०२०००६१५२०२५ दिनांक १ एप्रिल २०२५ जारी असून, प्रतिवादी म्हणून जिल्हाधिकारी, नगर परिषद जिंतूर व जिल्हा नगर प्रशासन विभाग यांचा समावेश करण्यात आला आहे.
दरम्यान, जिल्हाधिकारी परभणी यांनी पत्र क्र. जा.क्र. २०२५/नपाप्र/न्या.प्र./कावी-४६९, दिनांक २९ ऑगस्ट २०२५ अन्वये नगर परिषदेला या प्रकरणात जिल्हाधिकारी व जिल्हा नगर प्रशासन यांच्या वतीने प्रतिवाद सादर करण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे, न्यायालयात हजेरी लावणे, परिच्छेदवार उत्तर व शपथपत्र सादर करणे हे नगर परिषदेचे कर्तव्य असल्याचे श्री. आडे यांनी नमूद केले आहे.
त्यामुळे, त्यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले की, न्यायालयीन निर्णय लागेपर्यंत संबंधित सर्व प्लॉटची विक्री, नामांतर व नोंदी स्थगित ठेवण्यात याव्यात, तसेच नगर नोंदवहीत ''प्रकरण न्यायप्रविष्ट आहे'' असा उल्लेख करून कोणतीही पुढील कारवाई थांबवावी. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून, त्यापूर्वी नगर परिषदेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी श्री. आडे यांनी केली आहे.

### महानगरपालिका प्रशासनाने अनधिकृत नामफलक शिवसेनेच्या तीव्र आक्षेपानंतर तात्काळ हटविला




**परभणी,/प्रतिनिधी-** राष्ट्रीय महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वसमत रस्त्यावरील एका चौकात काही व्यक्तींनी अनाधिकृतपणे लावलेल्या नामफलकावर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह संतप्त कार्यकर्त्यांनी तीव्र आक्षेप नोंदविल्यानंतर महापालिका प्रशासनाने तो नामफलक हटविला.

गेल्या काही महिन्यांपासून काही व्यक्ती किंवा संस्थांकडून परस्परच पाट्या लावून चौकांचे, रस्त्याचे नामकरण करण्याचे प्रकार सर्रासपणे सुरु आहेत. त्याच मालिकेत येथील वसमत रस्त्यावर स्मशानभूमीजवळ अलि कॉर्नर नावाचा एक नामफलक काही व्यक्तींनी रातोरात झळकवला. सोमवारी तो प्रकार निदर्शनास आल्याबरोबर शिवसेनेच्या संतप्त पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी त्या अनाधिकृत फलकावर तीव्र आक्षेप नोंदविला व महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे धाव घेतली. स्मशानभूमी परिसरातील वसमत रस्त्यावरील अली कॉर्नर हा फलक पूर्णपणे अनधिकृत असल्याचे नमूद करत, त्याविरुद्ध तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, महानगर प्रमुख माणिक पोंढे, शहर प्रमुख सचिन पाटील, विधानसभा संघटक संदीप जाधव, उपतालुका प्रमुख सुभाषराव गरुड, बाळू मोहटे, रामदेव ओझा, महादेव खुणे, महानगर संघटक शेख शब्बीर, उपशहर प्रमुख महेश लंगोटे, कैलास पवार, राहुल शिंदे, राजकुमारसिंग टाक, आकाश सुरजोसे, बंडू झाडे, शिवप्रसाद लोखंडे, अमित भालेराव, निरज बुचाले आणि दिपक शिंदे नरेश येराळकर,विभाग प्रमुख पांडुरंग भालेराव, प्रभाग प्रमुख सुमित बंडे, शाखाप्रमुख योगेश्वर, मधुसूदन जाधव, कृष्णा शिंदे, कृष्णा वाघमारे, कल्याण रनेर, जालिंदर पोले, सुरज सिंग थापा, गोपी सिंग थापा, बोराडे, अजय पोळ, मंगेश काटकर, अभिषेक वाघ तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या.

दरम्यान, शिवसेनेच्या मागणीची महानगरपालिकेने तातडीने दखल घेत संबंधित अनधिकृत फलक त्वरित काढून टाकला. या वेगवान कारवाईबद्दल शिवसेना परभणी शहरतर्फे मनपाचे आभार मानण्यात आले. यानंतर जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांनी स्पष्ट केले की, शहरातील सर्व अनधिकृत नामफलकांविरुद्ध सातत्याने मोहीम राबवावी आणि भविष्यात कोणतीही व्यक्ती अथवा संस्था मनपाची परवानगी न घेता असे फलक लावणार नाहीत, यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, असे म्हटले.

## मास्टर स्पोर्ट्स कराटे अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची शालेय विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड

**महेश दिशागत**
**मानवत,/प्रतिनिधी-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी व सौ.रामकंवर द्वारकादास लड्डा विद्यालय मानवत. यांच्या संयुक्त विद्यमाने व के.के.एम महाविद्यालयाच्या बहुमोल सहकार्याने आयोजित दि.१७ ऑक्टों.२०२५ रोजी के.के.एम महाविद्यालय क्रीडा विभाग येथील प्रशस्त हॉलमधील मॅटवरती शालेय जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष



मा.विजयकुमारजी कत्रुवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.कल्याण पोले, सुयश नाटकर,यांच्यासह सर्व क्रीडा शिक्षक,मार्गदर्शक,स्पर्धक व पालक आवर्जून उपस्थित होते.या स्पर्धेमध्ये विशाल धिंगे यांच्या मास्टर स्पोर्ट्स कराटे अकॅडमी चे विद्यार्थी वयोगट १४ वर्षे आतील मुली कु.अद्रिका रुपेश देशपांडे,कु. वेदश्री महेश यादव, कू.ईश्वरी सुभाष आंबट, कु .निधी विवेक देव आदीची उपसिथती होती.

## सोनपेठ तालुक्यातील अवकाळी पाऊस

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ,/प्रतिनिधी-** गेली चार दिवसापासून हवामानात अचानक बदल झाल्याने आकाशात ढगांची दाटी होत होती. सोमवारी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास पावसाने आपल्या आसवांना मोकळी वाट करून दिली. आणि काही मिनिटातच संपूर्ण सोनपेठ तालुक्यात पाणीच पाणी झाले. तसेच मंगळवारी सुद्धा तिव्र स्वरूपाचा पाऊस झाला आणि फुटलेला कापूस व काढणीला आलेले सोयाबीन पिक पावसाने झोडपून काढले.

यावर्षीचा अतिवृष्टीने गाजलेला पावसाळा संपला म्हणून शेतकऱ्यांनी निःश्वास सोडला होता. पावसाची उसंत मिळाल्यामुळे तालुक्यातील बळीराजा शेतीच्या कामात दंग झाला होता. अनेकांनी कपाशी पिकावरील कीटकनाशकांची फवारणी सुरू केली तर कोणी फुटलेल्या कापसाची वेचणी सुरू केली होती. सोयाबीन काढणीचा हंगाम रंगात आला होता. अशावेळी सोमवार दि.२७ ऑक्टोंबर रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास अचानक आलेल्या पावसाने तालुक्यातील डिघोळ,धारडिघोळ,धामोनी,िनमगाव,डोंगरगाव या गावांना झोडपून काढले. सोनपेठ शहरात सोमवार हा आठवडी बाजार चा दिवस असल्याने बाजारात नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. दुपारी पावसाने त्यांनाही चिंब केले. बाजारात आलेल्या नागरीकांची फजिती झाली. अतिवृष्टीच्या पुराच्या



जखमा सुखण्या अगोदरच पुन्हा पावसाने सोमवार , मंगळवार दोन दिवस ओरबाडले. पावसाळा संपल्यानंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले.

# सरदार १५० एकता अभियानात सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'सरदार १५० एकता अभियान' अंतर्गत ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात जिल्ह्यात ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, तसेच विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

या अभियानांतर्गत भारत सरकारच्या माय भारतच्या नेतृत्वाखाली 'सरदार१५० युनिटी मार्च' या देशव्यापी उपक्रमाची



सुरुवात करण्यात येत आहे. याचे उद्दिष्ट देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून 'एक भारत, आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहित केले जाईल.

या कालावधीत पदयात्रा, विविध स्पर्धा आणि प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये डिजिटल फेसवर सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध स्पर्धा, सरदार यंग लीडर्स प्रोग्राम अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा, आरोग्य शिबिरे, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर व्याख्याने, ड्रग्ज मुक्त भारत प्रतिज्ञा इ. उपक्रमांचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले की, युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे, तसेच विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत युवा पिढीला सक्रिय योगदान देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी जिल्हास्तरीय पदयात्रा पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नांदेड येथे ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ ऑक्टोबर रोजी ही पदयात्रा जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनापर्यत काढण्यात येणार आहे. तरी या पदयात्रेत सर्व विद्यार्थी, नागरिक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व विभाग, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# भाजपा पक्षाच्या हाती सत्ता द्या,पुन्हा डबल विकासाचे पर्व सुरू होईल : आ. पवार

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २९ ऑक्टोबर-**

उमरी शहरासाठी आमदार म्हणून आज पर्यंत कोट्यावधी विकासाठी निधी दिला या पेक्षा ही अधिक विकास असेल तर भाजप युती सरकारचे सत्तेत नगराध्यक्ष , नगरसेवक निवडून द्या मी विकास कामात कमी पडणार नाही अशी गव्हावी आमदार राजेश पवार यांनी उमरी शहरातील विकास कामाच्या उदघाटन सोळ्यात बोलत होते .

विकास कामाच्या मुद्दावर लोकाप्रिय जनता मला आमदार म्हणून दुसऱ्यादां निवडून दिली आहे त्यांचा परतफेड मी विकासाच्या माध्यामातून करणार आहे . केंद्रात व राज्यात भाजप युतीचे सरकार असून उमरी शहरातचा विकास अधिकरित्या हवा असेल तर भाजपाचा नगराध्यक्ष नगरसेवक असने आवश्यक आहे .

त्या अनुषंगाने भाजपा च्या हाती सत्ता द्या मी विकासाठी कमी पडू देणार नाही असे अभिवचन आ . राजेश पवार यांनी दिले आहे . उद्योजक मारोतराव कवळे यांनी राजकीय प्रहार करीत माझ्यावर



अरोप करण्याऱ्यानी पाच खांडसरी सारखे कारखान हडप्प केले त्यामुळे ग्रामीण भागातील तरुणाचा रोजगगर कमी झाला असा ही अरोप गोरठेकर यांचे नाव न घेता अप्रत्यक्ष टोला लगावला आहे .

या संदर्भात विकास कामाचे धुमधड्यात उदगाटन झाले तरी गोरठेकर घराण्या सोबत राहीलेली मंडळी व विरोद्धक एकत्र दिसून आल्याने पुन्हा राजकीय चर्चेला डाव मतदारा पुढे प्रश्न चिन्ह उभा राहीला आहे. मात्र आजच्या चर्चे त गोरठेकर घराण्याला १५ वर्ष सत्ता दिली आता इतर पक्षानां संधी द्यावी अशी चर्चा रंगत आहे पण गोरठेकर की भाजप महायुती हा प्रश्न समोर येत आहे.

राजकीय पक्ष परिर्वनचा गोलमाल , विकासाचे मुद्दे जन सामान्यात रुजणार विषय ठरला आहे . आ. राजेश पवार यांच्या हस्ते उमरी शहरात विविध विकास कामांचे भूमीपूजन झाले आहे. विकासाचे पर्व घेऊन लोकप्रतिनिधी आले असे ऐकीव होते पण प्रत्यक्षात त्याचे प्रत्यंतर उमरी शहरातील जनता घेत आहे.

शहरात सामाजिक सभागृहासाठी पूर्वी रु. १४.५० लक्ष निधी वितरित केला होता त्या सभागृहाचे एअरकुलिंग व फर्निचरसाठी आ. राजेश पवार यांनी दोन कोटीचा अतिरिक्त निधी दिलेला असून हुतात्मा स्मारक गोरठा रोडवर सदरचे काम प्रगतीपथावर आहे. उमरी शहरातील श्री. संत दासगणू नगरमधील मार्कंडेश्वर मंदीराचे परिसरात रु. १.५१ लक्ष ३० हजाराचे निधीतून संरक्षण भिंत, पार्किंग शेड, गार्डन, ओपनजिम व खेळाचे साहित्य अशा अद्ययावत गार्डनची भूमीपूजन, बौध्द विहार (व्यंकटेशनगर शेजारील भागात) रु. २२ लक्ष चे १३३३ स्केअर फुटसभागृहाचे बांधकामाचे भूमीपूजन, श्रीमती जानकाबाई माने यांचे घर ते नगर परिषद कार्यालय सी. सी. रोडचे भूमीपूजन अंदाजित किंमत रू. ५४ लक्ष, तसेच शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी रु. २४ कोटी ज्यामध्ये २ पाणी साठवणूक टाकी, ज्याची क्षमता ६८८,०००,०० लिटर, १८०,०००,०० लिटर व ११०,०००,०० लिटर आहे तसेच २७ कि. मि. पाईप लाईन आदीं विकास कामांचा समावेश असून त्यासंपूर्ण कामांचे भूमीपूजन आ. राजेश पवार यांचे शुभ हस्ते करण्यात आला असून त्या कार्यक्रमास उद्योगपती तथा शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी ,माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, विजयकुमार उत्तरवार, शिवसेना शिंदे गटाचे तालूका अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, उद्योजक म. खाजा म. सजन सेठ, भाजपाचे तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर सावंत, उमरी शहराध्यक्ष बालाजीराव ढगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विक्रम देशमुख, तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर कदम, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बापुसाहेब कौडगावकर, शासकिय ठेकेदार संजीव सवई, बालाजीराव माचेवाड, किशोर पबितवार, सोनू वाघमारे, सौ. प्रणिता जोशी, सौ. दवनेताई, सौ. कांचन लोद, सौ. राणी ताई पोटेवाड, श्रीमती भारतबाई दुधंबे, नगरसेवक रतन खंदारे , संदिप गोवंदे संचिन खंडेलोटे , रोहीत देवसकवाड आदी मान्यवर अपस्थित होते भूमी पुजनाचे हे संपूर्ण कार्यक्रम आज दुपारी १२ वाजताचे पासून सुरू झाला असुन शहरातील नागरिकांनी ह्या भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन भाजपा तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर सावंत आणि शहराध्यक्ष बालाजीराव ढगे यांनी केले आहे होते .

## भाजपाच्या वतीने शिंदे यांनी धनेगाव सर्कलमध्ये मतदारांशी साधला संवाद

**नवीन नांदेड-** नांदेड दक्षिण मतदार संघातील नव्याने उदयास आलेल्या जिल्हा परिषद सर्कल हे सर्वसाधारण महिलांसाठी सुटल्याने माजी जिल्हा



परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक २९ सप्टेंबर रोजी सर्कलमधील गावोगावी जाऊन मतदारांच्या भेटीगाठी घेऊन संवाद साधला. नांदेड जिल्ह्यातील नांदेड दक्षिण मतदार संघात नव्याने निर्माण झालेले जिल्हा परिषद सर्कल हे सर्वसाधारण महिला आरक्षण सुटल्याने या सर्कल मधील सर्वच गावातून मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आपला मतदारांना विश्वासात घेऊन आश्वासन दिले की गेली पाच वर्ष आपण या सर्कलमध्ये जिल्हा परिषद सदस्य असताना भरपूर विकासात्मक कामे केली यापुढेही सर्कल मधील कुठलीही विकासात्मक कामे अपुरे राहू देणार नाही असे मत मनोहर पाटील शिंदे यांनी मतदारासमोर व्यक्त केले.यावेळी सर्कलमधी मतदारांशी संवाद अभियान राबवत धनेगाव सर्कल मध्ये कमळमय वातावरण तयार केले असल्याचे चित्र दिसून येते. संवाद अभियानात माजी सरपंच भुजंगराव भालके, सरपंच पिंटू पाटील शिंदे, रमेश वाघमारे, राजेश बोटलवार, शिवाजी बुचडे, शेख एजाज, तातेराव ढवळे, निलेश भालके, जळबाजी बुचडे, गोपीचंद धनेगावकर, मारुती संगेकर, शैलेश ठाकूर, मारुती तळणे आदींचा सहभाग होता.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या कंधार-लोहा तालुका निरीक्षकपदी मोहनअण्णा हंबर्डे

**नवीन नांदेड** -आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने कंधार आणि लोहा तालुक्यासाठी निरीक्षक म्हणून दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे नेताजीराव भोसले व डॉ.आशिया कौसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने कंधार शहरातील आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कार्यालय येथे शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी स.१०.०० वाजता इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. व दुपारी १.०० वाजता आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे लोहा शहरातील बस स्थानकाजवळील संपर्क कार्यालयात इच्छुकांच्या मुलाखती माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, नेताजीराव भोसले डॉ.आशिया कौसर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहेत. जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद निवडणुक लढू इच्छुक पदाधिकाऱ्यांनी वरील ठिकाणी उपस्थित राहून मुलाखती देण्याचे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कंधार तालुकाध्यक्ष मनोहरराव भोसीकर व लोहा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी यांनी केले आहे.

## आमदार चिखलीकर यांनी संधी दिल्यास पं.स.हळदा गणातुन निवडणुक लढवणार

**कंधार** -आगामी होणाऱ्या स्थानीक स्वराज निवडणुकीत शिराढोण



जिल्हा परीषेद सर्कल मधील पंचायत समिती हाळदा गणातुन कंधार लोहा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांनी संधी दिल्यास राष्ट्रवादी काग्रेस अजित पवार गटाकडून पुर्ण ताकदिनीशी निवडणुक लढवणार आसल्याची माहीती सचिन पाटिल शिंदे यांनी दैनिक तरुण भारत प्रतीनिधीशी बोलताना दिली . सचिन पाटील शिंदे हे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष आणि हाळदा ग्रामपंचायत चे माजी उपसरपंच व माजी सरपंच अशा विविध पदावर आसताना हाळदा गणातील जनतेंची अनेक प्रश्न मार्गी लावलेले आहेत त्याच बरोबर सामाजीक चळवळीत सक्रिय सहभाग घेणारे गावातील व परिसरातील गोरगरिबांचे प्रश्न तळमळीने सोडविणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख शिराढोण सर्कलमध्ये निर्माण केलेली आहे . राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व आमदार चिखलीकर या युवा नेत्यास संधी देतील का हे तितकेच महत्त्वाचे आहे .हाळदा गणातील व परिसरातील गावांमधुन सचिन पाटील शिंदे यांनाच उमेदवारी मिळावी अशी मागणी सर्व सामान्य गोरगरीब जनतेतुन जोरदार पणे होत आसताना दिसत आहे.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा माहूरच्या तुपदाळे दाम्पत्यांकडून सत्कार

**माहूर**-जिल्हा काँग्रेस पक्ष कार्यालय, नांदेड येथे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे मार्गदर्शनाखाली पक्षाची आढावा बैठक नुकतीच संपन्न झाली. यावेळी नांदेड लोकसभेचे खासदार रविंद्र चव्हाण, जिल्हा अध्यक्ष राजेश पावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा माहूर नगरपंचायतच्या माजी उपनगराध्यक्षा सौ.अश्विनी आनंद पाटील तुपदाळे व काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आनंद गंगाधरराव पाटील तुपदाळे या दंपतीकडून हृदय सत्कार करण्यात आला.याप्रसंगी जगदीश गंगाधरराव पाटील तुपदाळे,जमीर खान,सादिक शेख,शरीफ शेख, मन्नाण शेख इत्यादी माहूर तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अवैध रेती उत्खनन करणारे साहित्य नष्ट; नांदेड महसूल पथकाची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आज २९ ऑक्टोबर २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार, मंडळ अधिकारी कुणाल जगताप, अनिरुद्ध जोंधळे, मोहसीन सय्यद, ग्राम महसूल अधिकारी, मनोज जाधव, माधव भिसे, बरोडा श्रीरामे, जमदाडे, मनोज सरपे, महेश जोशी, महसूल सेवक बालाजी सोनटक्के, शिवा तेलंगे या महसूल पथकाने विष्णुपुरी



परिसरामध्ये पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधासाठी गस्तीवर असताना रेती उत्खनन करणारे २ मोठ्या बोटी, एक छोटी बोट व ४ इंजिन आढळून आले.

या पथकाने मजुरांच्या साह्याने ३ बोटी व ४ इंजिन जिलेटीने स्फोट करून नष्ट केले. तसेच ३० तराफे जाळून नष्ट केले, असे एकूण ६३ लाख किंमतीचा मुद्देमाल जाग्यावरच स्फोट करून नष्ट केला. एक अवैध वाहतूक करणारी हायवा एमएच २६ बीसी ४८९२ जप्त करून तहसील कार्यालय परिसरामध्ये लावण्यात आला आहे. सदर हायवावर दंडात्मक फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याची तजवीच करण्यात आली आहे.

या कारवाई दरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले व पोलीस जमादार शिंदे, श्री. घुगे व श्री. जाधव यांचे पोलीस पथक उपलब्ध करून दिले. अवैध उत्खननासंदर्भात नांदेड महसूल प्रशासन सक्तीने कारवाई करेल असा इशारा नांदेडचे उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.

## पशुधन पर्यवेक्षक भरतीसाठी लवकरच मंत्रालयात उपोषण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रातील पशुसंवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक पदभरती तात्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी राज्यातील असंख्य विद्यार्थी लवकरच मंत्रालय, मुंबई येथे अमरन उपोषणास बसण्याच्या तयारीत आहेत. या आंदोलनाला राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ठाम पाठींबा देण्यात आला असून फैसल सिद्दीकी यांनी याबाबत तीव्र भूमिका घेतली आहे.

ग्रामीण भागात लम्पी (चर्मरोग) या रोगाने मोठ्या प्रमाणावर जनावरे बाधित होत असून पूर आणि पावसाने पशुधनाचे मोठे नुकसान झाले आहे. एक जनावर दगावणे म्हणजे गोरगरीब शेतकऱ्याच्या संसाराचा आधार कोसळणे, असे या आंदोलनकर्त्यांचे मत आहे.

# लोहगावात श्रावण पाटील भिलवंडेंची 'राजकीय चाल आ.अंतापुरकरांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल ; प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात खळबळ

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २९ ऑक्टोबर-**

येथून जवळ असलेल्या लोहगाव जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज एक मोठी राजकीय चाल खेळली गेली. श्रावण पाटील भिलवंडे यांनी आज (दि. २९ ऑक्टोबर) आमदार जितेश अंतापुरकर यांच्या उपस्थितीत पक्षश्रेष्ठीकडे उमेदवारी मागणीचा अर्ज दाखल करून आपली दावेदारी अधिकृत केली. या हालचालीमुळे लोहगाव गटातील राजकारणात चैतन्य आणि प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात खळबळ निर्माण झाली आहे.

अर्ज दाखल करण्याच्या वेळी कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह



पाहायला मिळाला. भिलवंडे यांनी यावेळी बोलताना ते म्हणाले, लोहगाव परिसरातील सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी, तसेच ग्रामविकासाचा नवा अध्याय सुरू करण्यासाठी आम्ही मैदानात उतरलो आहोत. गावागावातील अडथळे दूर करून विकासाची गंगा वाहवणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.

दरम्यान, आमदार जितेश अंतापुरकर यांनीही या प्रसंगी कार्यकर्त्यांशी संवाद साधत, लोहगाव गटात पक्षसंघटन मजबूत करून विकासाचे राजकारण पुढे नेणे आवश्यक आहे असे सांगितले. लोहगाव गटातील या उमेदवारीमुळे स्थानिक राजकारणात नवीन समीकरणे तयार होत असून, प्रतिस्पर्धी इच्छुकांच्या गणितात बदल होण्याची दाट शक्यता आहे. राजकीय पटलावर भिलवंडेंनी टाकलेली ही चाल 'खेळी' ठरू शकेल का, हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होईल!

# दरोड्याच्या तयारीत असलेले दोन गुन्हेगारांना अटक

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २९ ऑक्टोबर-**

जिल्ह्यात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या ऑपरेशन फ्लश आऊट मोहिमेअंतर्गत रामतीर्थ पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन संशयित गुन्हेगारांना फिल्मी स्टाईलने पकडण्यात यश मिळवले आहे. या दोघांकडून धारदार हत्यारे, दोन वाहने व मोबाईलसह तब्बल १० लाख २१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



याबाबत रामतीर्थ पोलिसांनी दिलेली सविस्तर माहिती अशी की, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे व देगलूर पोलीस ठाण्याचे पोनि मारोती मुंडे हे त्यांच्या पथकासह गस्तीदरम्यान असताना खात्रीशीर माहिती मिळाली की, पांढरी पिकअप व डिझायर कारमधून काही संशयित शस्त्रांसह देगलूरहून नरसीकडे निघाले असून, ते दरोड्याचा गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत आहेत.

त्यानुसार दोन्ही अधिकाऱ्यांनी तत्काळ आपले पथक तयार करून वाहनांचा पाठलाग केला. दिनांक २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ४ वाजता मौजे डोनगाव (खु.) शिवारात संशयित वाहनांना थांबवण्यात आले. तपासाअंती कर्तारसिंग हत्यारसिंग टाक (रा. इंद्रानगर, कळमनुरी, जि. हिंगोली) व सुर्यकांत रामराव कुगावकर (रा. माळेगाव, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) असे दोघे संशयित पकडले गेले, तर इतर तीन जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

झडतीदरम्यान धारदार तलवार, चाकू, लोखंडी पाईप, स्टील रॉड, मोबाईल फोन, तसेच दोन वाहने बोलेरो पिकअप व डिझायर कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात आरोपी हे हिंगोली जिल्ह्यातून नांदेड जिल्ह्यात दरोडा घालण्यासाठी आले असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलीस ठाणे रामतीर्थ येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना अटक करून पोलीस कोठडीत (झउठ) ठेवण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

या कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे व देगलूर पोलीस ठाण्याचे पो.नि. मारोती मुंडे व अंमलदारांचे कौतुक केले असून, त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पराभूत उमेदवारांच्या नादी लागू नका विकासासाठी चिखलीकर कुटुंब सक्षम : प्रवीण पाटील चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ ऑक्टोबर-**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर आणि चिखलीकर कुटुंबीय सक्षम आहे. त्यामुळे पराभूत आणि लबाडांच्या नादी लागू नका असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य परवीन पाटील चिखलीकर यांनी केले

आलेगाव ते आनंदनगर येथील एक कोटीच्या सीसी रस्त्याचे भूमिपूजन जिल्हा परिषद सभापती तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते नागरिकांशी बोलत होते.

पुढे ते म्हणाले, या सर्कलमध्ये गेल्या पाच वर्षांच्या काळात रस्ते, नाले आणि विकासाच्या योजना राबविल्या. जिल्हापरिषदेच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहचविल्या आहेत. आलेगावच्या पाणंद रस्त्यासाठी १३ लाख रुपयांचा निधी अन्य कामांसाठी ३०लक्ष रुपयांचा निधी खेचून आणला. आलेगाव आणि चिखलीचे आमचे संबंध कै. शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्यापासूनचे आहेत.




त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये आपला आशीर्वाद आमच्या पाठीशी ठामपणे राहुद्या. निवडणूक जवळ आला की जातीवाद करणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असते. लोकांची दिशाभूल करणे, हा त्यांचा कायमचा धंदा झाला आहे. त्यामुळे जनतेने संभाळून रहावे. चिखलीकर कुटुंबाने कधीही जातीवाद केला नाही. १९८४ मध्ये चिखली येथे शैक्षणिक संस्था उभारून या भागात शिक्षणाची गंगा आणली. त्यामुळे या भागातून असंख्य विद्यार्थी विविध शासकीय सेवेत रुजू झाले. स्वतःचा विकास करताना समाजाचा आणि राष्ट्राचा विकास करण्यासाठी त्यांनी हातभार लावला आहे. त्यामुळे चिखलीकर कुटुंबांनी नेहमीच सर्वांच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. हे कुटुंब सर्वांना सोबत घेऊन चालणारे आहे. आम्ही तुमच्या सुखात आणि दु:खात नेहमीच सहभागी आहोत. चिखली आणि सावळेश्वर हे दोन्ही गावे बारूळ जिल्हा परिषद गटात गेल्याने काही लोक आनंदी होत आहेत. परंतु या भागातही आ. चिखलीकर यांचा मोठा संपर्क आहे. त्यामुळे या गटातही चिखलीकर साहेबांचे जिवाभावाचे लोक आहेत.त्यामुळे या भागातही लबाडांना संधी मिळणार नाही. विरोधकांना येथे आतापासूनच पराभव दिसू लागला असल्याने ते बिथरले आहेत. काहीही आरोप ते करतील. भूलथापा मरतील त्यामुळे अशा भूलथापाना बळी पडू नका असे आवाहन प्रवीण पाटील चिखलीकर यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, पंचायत समीतीचे माजी सभापती शंकरराव ढगे, माजी पंचायत समिती सदस्य विजय मदावाड बसलिंग भुरे नाना पाटील इंगोले वैजनाथ पाटील घोरबांड,विनायक पाटील,साईनाथ कपाळे, सुरेश मामा पाष्टे, केशव पाटील सावळेश्वरकर, यांच्यासह परिसरातील पदाधिकाऱ्यांची उपस्थित होते .

यावेळी माजी सरपंच बालाजी पाटील वरताळे, उपसरपंच प्रकाशराव पाटील मोरे, ग्राप सदस्य मोहन मोरे, मारोती मोरे, दादाराव मोरे,आनंदा मोरे, शहाजी मोरे, माधवराव मोरे, यांच्यासह आले गावातील शेकडो ग्रामस्थ पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक संग्राम मोरे यांनी केले तर आभार परमेश्वर पाटील मोरे यांनी मानले.

# एकता दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २९ ऑक्टोबर-**

अर्धापूर पोलीस प्रशासनाच्या वतीने दि. ३१ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त मरॉथान स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धे तील विजेत्यांना आकर्षक बक्षिसासह ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त खेळाडूसह युवक युवतींनी या स्पर्धे त सहभाग घ्यावा. असे आवाहन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी केले आहे.



राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून अर्धापूर पोलीस प्रशासनाने दि. ३१ ऑक्टोंबर रोजी सकाळी ६.०० वाजता मरॉथान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा वसमत फाटा महामार्ग पोलीस चौकी ते पार्डी बायपास पर्यंत तीन किलोमीटर अंतराची राहणार असून या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपये रोख व ट्रॉफी आणि उत्तेजनार्थ विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी बक्षीस दिले जाणार आहे.

या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी अर्धापूर पोलीस ठाणे कार्यालयात रुम नंबर ३ मधील पोलीस जमादार भिमराव राठोड यांच्याकडे आपल्या ओळखपत्रासह नांव नोंदणी करावी. असे आवाहन अर्धापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.


अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या
परभणी जिल्हा (ग्रामीण)
जिल्हाध्यक्ष पदी
नियुक्ती झाल्याबद्दल
मा.आ.श्री.बाबाजानी
दुर्राणी साहेबांचे
हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक ::- पाथरी तालुका व शहर काँग्रेस कमिटी